MAHMARI 19358/13/1/2000 - TC

विद्या प्रसारक मंडळ
स्थापना • नौपाडा ठाणे • १९३५



# व्ही.पी.एम्. दिशा

वर्ष बाविसावे / अंक ८ / ऑगस्ट २०२१

## संपादकीय

### स्मरण - एका देशभक्त रसायनशास्त्रज्ञाचे

'आत्मनिर्भर भारत' हा सध्या परवलीचा जोड शब्द झाला आहे. आपल्या दैनंदिन जीवनाला आवश्यक असणाऱ्या वस्तूंची निर्मिती आपल्याच देशात झाली पाहिजे असा आग्रह मागील काही वर्षांपासून धरण्यात येत आहे. हाच विचार एका प्रसिद्ध भारतीय रसायनशास्त्रज्ञाने एका शतकापूर्वी मांडला होता. केवळ विचार मांडून ते थांबले नाहीत तर त्यांनी एका उद्योगाची सुरुवात देखील केली होती. ब्रिटिश राजवटीत भारतात कारखानदारी फारशी नव्हतीच. येथील कच्चा माल मातीमोल भावाने घेऊन ब्रिटिश सत्ताधारी तो इंग्लंडला पाठवित असत. तिथे प्रक्रिया करून भारतात आलेला पक्का माल मात्र अव्वाच्या सव्वा किंमतीने विकला जात असते. त्यामुळे देशातील संपत्ती इंग्लंडकडे जात असे. संपत्तीचा हा ओघ थांबवायचा असेल तर कच्च्या मालावर प्रक्रिया करणारे कारखाने आपल्याच देशात काढले पाहिजेत असा त्यांचा आग्रह होता. हा विचार प्रत्यक्षात आणण्यासाठी १९०१ साली त्यांनी बेंगाल केमिकल अँड फार्मस्युटीकल्स (Bengali Chemicals and Pharmaceuticals) नावाची कंपनी स्थापन केली. या कंपनीने देशात लागणारी रसायने आणि औषधे बनवायला सुरुवात केली. आजही ही कंपनी आपले अस्तित्व टिकवून आहे. या कंपनीची मुहूर्तमेढ उद्योगपतीने नाही, तर एका रसायनशास्त्रज्ञाने रोवली. त्यांचे नाव आचार्य प्रफुल्लचंद्र रे. २ ऑगस्ट ही त्यांची जयंती आहे. त्या निमित्ताने या महान देशभक्त रसायनशास्त्रज्ञाचे स्मरण करीत आहोत.

२ ऑगस्ट १८६१ रोजी एका बंगाली जमीनदार कुटुंबात प्रफुल्लचंद्र यांचा जन्म झाला. घरात शैक्षणिक वातावरण असल्याने त्यांना औपचारिक शिक्षण घेण्यासाठी घरीच प्रोत्साहन मिळाले. या संधीचे त्यांनी सोने केले. शालेय शिक्षण झाल्यावर महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी ते कोलकत्त्याला आले. कोलकत्ता विद्यापीठाची स्नातक परीक्षा ते उत्तम गुणांनी उत्तीर्ण झाले. त्यामुळे त्यांना इंग्लंडमधील विद्यापीठात पुढील शिक्षण घेण्यासाठी गिलख्रिस्ट शिष्यवृत्ती (Gilchrist Scholarship) मिळाली. वयाच्या २१ व्या वर्षी ते इंग्लंडला गेले. त्यांनी एडिनबरा विद्यापीठात (Edinburgh University) आधी शिक्षण घेतले आणि नंतर रसायनशास्त्रात संशोधन केले. धातूंच्या दुहेरी क्षारावर केलेल्या आपल्या संशोधनावर आधारित प्रबंध लिहून त्यांनी विद्यापीठाला सादर केला. संशोधनाचा स्तर इतका उच्च होता की, हा प्रबंध स्वीकारून विद्यापीठाने त्यांना मानाची डी. एससी (D. Sc.) ही पदवी बहाल केली.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरून - **संपादकीय)**


त्याचबरोबर विद्यापीठाने पुढील संशोधनासाठी त्यांना होप शिष्यवृत्ती देखील दिली. त्याचा उपयोग करून काही काळ संशोधन करीत ते तिथेच राहिले. १८८७ मध्ये एडिनबरा विद्यापीठाने त्यांना फॅरेडे सुवर्ण पदक देऊन त्यांचा सत्कार केला. त्यांनी ठरवले असते तर इंग्लंडमध्ये राहून ते आपले अध्यापन आणि संशोधनाचे काम करू शकले असते. परंतु देशासाठी काहीतरी करण्याची इच्छा त्यांना भारतात परत घेऊन आली. एक यशस्वी संशोधक म्हणून १८८७ मध्ये ते भारतात परतले.

प्रफुल्लचंद्र रे हे जसे एक उत्तम संशोधक होते तसेच ते एक उत्तम शिक्षकही होते. भारतात परत आल्यानंतर त्यांनी कोलकत्त्याच्या प्रसिद्ध प्रेसिडेन्सी कॉलेजमध्ये (Presidency College) शिकवायला सुरुवात केली. पाठ्यपुस्तकातून मिळणाऱ्या तुटपुंज्या माहितीवर अवलंबून न राहता विद्यार्थ्यांनी मिळेल त्या मार्गाने अधिकाधिक माहिती मिळवावी असा त्यांचा आग्रह असे. सैद्धांतिक ज्ञानाबरोबरच विद्यार्थ्यांनी प्रायोगिक कौशल्ये देखील हस्तगत केली पाहिजेत यासाठी ते विशेष प्रयत्न करीत असत. त्यामुळे अल्पावधीतच ते विद्यार्थ्यांमध्ये लोकप्रिय झाले. म्हणूनच त्यांना 'आचार्य' ही पदवी बहाल करण्यात आली. ते आचार्य प्रफुल्लचंद्र रे (Acharya Prafulla Chandra Ray) या नावाने प्रसिद्ध आहेत. त्यांनी अनेक कर्तबगार विद्यार्थी घडवले. त्यामध्ये मेघनाद सहा, जगदिशचंद्र बोस ही नावे वरच्या स्थानावर आहेत.

प्राचीन काळात भारतीय संशोधकानी अनेक क्षेत्रात खूप प्रगती केली होती असे आपणास वारंवार सांगण्यात येते. परंतु नेमके त्यांनी काय केले याची सामान्य माणसाला काहीच माहिती नसते. ती व्हावी यासाठी आचार्य रे यांनी प्रयत्न केले. रसायनशास्त्र हा त्यांचा अभ्यास आणि संशोधनाचा विषय होता. या क्षेत्रात भारतीय मंडळींचे योगदान काय होते याची त्यांनी विविध मार्गांनी माहिती मिळविली. त्यानंतर त्यांनी, 'प्राचीन आणि मध्ययुगीन काळातील भारतीय रसायनशास्त्राचा इतिहास' (History of Chemistry in Ancient and Mediaeval India) या नावाचा एक अभ्यासपूर्ण ग्रंथ लिहिला. हा अतिशय माहितीपूर्ण आणि वाचनीय असा ग्रंथ आहे. १९७६ ला मी जेव्हा टाटा मूलभूत संशोधन संस्थेत रुजू झालो तेव्हा संस्थेच्या वाचनालयातून घेतलेले हे माझे पहिले पुस्तक होते. ते मी आधाशासारखे वाचून काढले. तेव्हा माझ्या मनात आचार्य रे यांच्या बद्दल जो आदरभाव निर्माण झाला तो आजतागायत कायम आहे.

आचार्य प्रफुल्लचंद्र रे यांचे व्यक्तिमत्त्व बहुआयामी होते. ते एक उत्तम शिक्षक होते, त्याचबरोबर उत्तम संशोधकही होते. एवढेच नाही तर ते एक उत्तम उद्योजक देखील होते. त्यांची राहणी अतिशय साधी होती. एक दानशूर व्यक्ती अशी त्यांची प्रतिमा होती. 'भारतीय रसायनशास्त्राचे पितामह' म्हणून त्यांना ओळखले जाते. विज्ञानाचा आधार घेऊन देशाची प्रगती साधता येते यावर त्यांचा विश्वास होता. त्यादृष्टीने त्यांनी प्रयत्न देखील केले. लंडनमधील रॉयल सोसायटी ऑफ केमिस्ट्री या संघटनेने त्यांचा सत्कार केला. ब्रिटिश सरकारने त्यांना नाईटहूड देऊन सन्मानित केले. १६ जून १९४४ रोजी या महान भारतीय शास्त्रज्ञाने आपली इहलोकीची यात्रा संपवली. कोलकत्ता येथील त्यांच्या प्रयोगशाळेचे त्यांच्या स्मारकात रूपांतर करण्यात आले आहे. या महान व्यक्तीची माहिती कॉलेजमध्ये जाणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला होणे आवश्यक आहे. त्यांच्या जयंतीनिमित्त विद्या प्रसारक मंडळ त्यांना अभिवादन करीत आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष बाविसावे/अंक ८/ऑगस्ट २०२१

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष २६ वे/अंक २ रा)

**कार्यालय/पत्रव्यवहार**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
**www.vpmthane.org**

**मुद्रणस्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ १२९१**
**२५४१ ३५४६**
**Email:perfectprints@gmail.com**

## *अनुक्रमणिका*

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | डॉ. सुधाकर आगरकर | |
| २) | झाले बहु, होतील बहु, परी यासम हा... | शैलजा बेडेकर | ३ |
| ३) | मार्गारेट ॲटवूडची 'द टेस्टामेण्टस्': एक डीसटोपीयन कादंबरी | डॉ. प्रशांत धर्माधिकारी | ७ |
| ४) | ज्ञानेश्वरी (अध्याय : ४) | भाग्यश्री कुलकर्णी | ११ |
| ५) | एस. टी. कोलरिज या इंग्रजी कविला उद्देशून- | प्रा. डॉ. आनंद कुलकर्णी | १४ |
| ६) | निसर्ग, सामान्य विज्ञान ते ... ऊर्जा | दिलीप नारायण वंडलकर | २० |
| ७) | पुस्तक परीक्षण - गणित अध्यापक आणि प्रसारक : स. पां. देशपांडे | डॉ. सुधाकर आगरकर | २३ |
| ८) | ग्रंथ परिचय - गुरुदेव रानडे व्यक्तिमत्व आणि तत्त्वज्ञान | डॉ. हेमचंद्र कोपर्डेकर | २५ |
| ९) | परिसर वार्ता | संकलित | २६ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून, त्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. 'दिशा'च्या संदर्भात

- आपण 'दिशा' नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- हे व्यासपीठ **अभ्यासपूर्ण लेखांसाठी** आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून 'दिशा'ला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: देणगी मूल्य देऊ शकता व इतरांना सांगा.
- आपले देणगी मूल्य द्यायचे राहिले नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात देणगी मूल्य, लेख पाठवावयाचे असतील तर ते कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, नौपाडा, ठाणे - ४००६०२ या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेकडून देणगीमूल्य पाठवावे.
- www.vpmthane.org या संकेतस्थळावर 'दिशा'चे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक देणगी मूल्याचा रु. ५००/- चा धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.
- कृपया वर्गणीदार व्हावे.

- संपादक

# झाले बहु, होतील बहु, परी यासम हा...

*१ ऑगस्ट ही लोकमान्य टिळकांची पुण्यतिथी. लोकमान्य टिळकांच्या महान कार्याचा आढावा या लेखात विशद केला आहे - संपादक*

१ ऑगस्ट १९२० साली महाराष्ट्रातील एक महान तेजस्वी ज्योत अनंतात, पंचतत्त्वात विलीन झाली. आज त्या घटनेला बरोबर एक शतक पूर्ण होत आहे. त्या तेजस्वी ज्योतीचे मूळ नाव 'केशव गंगाधर टिळक'. भारतमातेच्या ललाटावरील सौभाग्यतिलकच जणू. त्यांच्या मातोश्रींनी पुत्रप्राप्तीकरता सूर्योपासना केली होती. त्या रवीभास्कराचे तेज स्फुल्लिंग घेऊनच हे पुत्ररत्न जन्माला आले होते. त्यांची आई त्यांना प्रेमाने, कौतुकाने 'बाळ' म्हणूनच हाक मारायची आणि म्हणूनच तेच नाव पुढे त्यांनी आपल्या मातेची आठवण म्हणून कागदोपत्री व्यवहारात कायम ठेवले. तेच लोकमान्य बाळ गंगाधर टिळक. भारतीय स्वातंत्र्याचे जे यज्ञकुंड पेटलं होतं त्यातूनच एका जहाल, तेजस्वी विभूतीचा जन्म झाला होता. साल होतं २३ जुलै १८५६.

रत्नागिरीतल्या चिखल गावी चिखलात एक कमळ फुललं होतं. त्याचे मूळ नाव होतं केशव. संध्येतील २४ नावांपैकी एक नाव. सूर्याची एक तेजस्वी विभूतीच अवतरली होती भारतभूमीवर. त्यांना पाजली गेलेली गुटी (बाळगुटी) ही तेजाचे पोषण करणारी होती. त्यामुळे त्यांचे अवघे व्यक्तिमत्त्वच तेजस्वी हिऱ्याप्रमाणे चमकत होते आणि म्हणूनच ते ब्रिटिश राज्यकर्त्यांना सहन होत नव्हते.

टिळक होते अत्यंत तत्त्वनिष्ठ, होते अत्यंत सत्यनिष्ठ, न्यायनिष्ठ. आणि हेच तर इंग्रज सरकारला खपत नव्हते. लोकांनी त्यांना दिलेले पुढारीपण लोकमान्यत्व सरकारच्या डोळ्यात खुपत होते. त्यांनी स्वदेश हाच देवाचे मंदिर मानले होते. त्याच्या पुजेकरताच त्यांनी आपले अवघे जीवन वाहून घेतले होते. संतसज्जनांच्या रक्षणाकरता आणि राक्षसी वृत्तींचा नाश करण्याकरता, सत्यधर्मरक्षण, आचार संवर्धन करण्याकरताच भगवंताच्या विभूती अवतार घेतात. लोकमान्यांनी पण हेच कार्य अंगिकारले होते. ते म्हणत की, भारत हा काही श्रीमंत, संस्थानिकांचा देश नाही; तर शेतकरी इथला आत्मा आहे आणि चांभार, महार, मांग, तेली, तांबोळी, कोळी, माळी, साळी, लोहार, सुतार, कातकरी, वारली अशा अठरापगड जाती-जमाती मिळून भारत होतो. हे त्या काळात टिळकांनी पहिल्यांदा सांगितले. म्हणूनच ते भारतीय लोकांचे 'लोकमान्य' झाले.

लोकमान्य टिळक म्हणजे एक परीपूर्ण महापुरुषच होते. अत्यंत धीरोदात्त, अत्यंत शुद्ध चारित्र्य संपन्न. ''निश्चयाचा महामेरू, बहुत जनांसी आधारू।'' असेच त्यांचे व्यक्तिमत्त्व होते. त्याच्या कार्याची रूपरेषा १) स्वदेश २) परदेशी वस्तूंवर बहिष्कार ३) राष्ट्रीय शिक्षण आणि ४) स्वराज्य अशी होती. त्यांच्या या कार्यामुळेच त्यांना 'हिंदी असंतोषाचे जनक' म्हणून ठरविले गेले.

स्वदेश स्वातंत्र्याचे त्यांचे ध्येय हे केवळ उत्कट, भव्य होते. ते स्वातंत्र्य त्यांना केवळ स्वतःकरता नको होते. त्यात त्यांचा वैयक्तिक स्वार्थ काहीही नव्हता. स्वदेश, स्वातंत्र्य हा प्रत्येकाचा मूलभूत हक्क आहे, जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो प्रत्येकाला मिळालाच पाहिजे म्हणून त्यांनी स्वातंत्र्य चळवळ, स्वातंत्र्यलढा उभा केला होता. चळवळीमागचे सामर्थ्य त्यांना कळलं होतं. म्हणून तर त्यांनी गणेश उत्सव, शिवजयंती उत्सव

चालू केले. ते त्याद्वारे लोकजागृती करत होते. देश स्वातंत्र्याचा महान मंगल मंत्र लोकांना देत होते. 'केसरी'तून डरकाळी फोडत होते. 'मराठा'तून तोफ डागत होते. ''सरकारचे डोकं ठिकाणावर आहे का?'' असा निर्भयपणे, निर्भीडपणे सरकारला जाब विचारत होते. अशा प्रश्नातून एकीकडे लोकजागृती होत होती तर दुसरीकडे ब्रिटिश सरकारला धडकी भरत होती. कारण त्यांचे राजसिंहासन डळमळत होते आणि म्हणूनच तर लोकमान्य त्यांच्या डोळ्यांत खूपत होते. त्यांची डोकेदुखी ठरत होते.

लोकमान्य कायद्याचे अभ्यासक होते. कायदेपंडित होते. कायद्याच्या बाहेर जाऊन ते कधीच बोलत नसत. देश स्वातंत्र्यासाठी त्यांनी आपले अवघे तन-मन-धनच नव्हे तर अवघे जीवनच अर्पिले होते. स्वतःला देशकार्यात वाहनू घेतले होते. ध्यानी, मनी, स्वप्नी ते देश स्वातंत्र्याचाच विचार करत होते. असा हा भारतमातेचा सुपुत्र बहुगुणी, अष्टपैलू होता, बुद्धिमान होता, विद्वान पण. त्यांना ह्या कशाचाच गर्व नव्हता. काय नव्हते त्यांच्याजवळ? ते उत्तम गणिती होते. संस्कृत भाषेवर प्रभुत्व होते. ते पंचागकर्ते होते, उत्तम व्याख्याते होते, कीर्तनकार, प्रवचनकार होते, न्यायी होते. कोणावरही अन्याय झालेला खपत नसे. मानवतावादी होते. आपल्यामुळे कोणावरही अन्याय होता कामा नये याकरिता ते अत्यंत दक्ष असत. बंदीवासात असतांना त्यांना चांगले जेवण दिले जात नव्हते. ते त्यांच्यावर लक्ष ठेवणाऱ्या रक्षकाला सहन होत नव्हते. म्हणून तो त्यांना अत्यंत गुप्तपणे काही काही खायला आणून देत असे. लोकमान्य त्याला सांगत, ''अरे! बाबा तू माझ्याकरता असं काही करू नकोस. त्यामुळे तुझे आयुष्य धोक्यात येईल.'' मंडालेला त्यांच्याबरोबर एक आचारी दिला होता. त्याच्याकरता अगदी हलक्या प्रतीचे किडके धान्य देत असत. लोकमान्यांनी मात्र त्या आचाऱ्याला आपल्यातलेच अन्न खायला लावले. त्याच्याकडून कुठलीही सेवा करून घेतली नाही.

गायकवाड वाड्यात खूप लोक त्यांच्याकडे मदत मागायला येत असत. त्यांना कोणालाही त्यांनी विन्मुख पाठविले नाही. ते अत्यंत निर्भय आणि अत्यंत निस्पृह होते. त्यांची कोणाकडूनही कसलीही अपेक्षा नव्हती. खरोखर हे सगळे विभूतीचे दैवी गुणच त्यांच्या ठिकाणी होते असेच म्हणावे लागेल.

ब्रिटिश सरकारच्या मनात त्यांच्याबद्दल खूप आकस होता. सरकार त्यांच्याशी खूप अन्यायाने वागत होते. पण तरीही मंडालेची ६ वर्षांची शिक्षा त्यांनी स्थिर बुद्धीने स्वीकारली. वयाच्या ६५ व्या वर्षी आणि न्यायालयात स्वतःच्या बचावाचे भाषण त्यांनी २१ तास उभे राहून केले होते. ''निश्चयाचा महामेरूच होते ते. ते म्हणाले, 'या न्यायालयाच्या वरती जे सर्वोच्च न्यायालय आहे तिथे मी नक्कीच निर्दोष आहे.'' पण त्या डावरच्या काळजाला पाझर फुटला नाही. लोकमान्य म्हणाले, ''ठीक आहे. माझ्या हातून चांगले काही तरी कार्य करून घ्यायचे असेल परमेश्वराला.''

देश स्वातंत्र्याकरता, स्वराज्याकरता त्यांनी केलेले कार्य एवढे महान होते की, केवळ महाराष्ट्रातच नाही तर साऱ्या हिंदुस्थानने लोकमान्यांना आपला नेता म्हणून मान दिला होता. त्यांना ६ वर्षांची मंडालेची शिक्षा झाल्याचे कळल्यावर कामगारांनी ६ दिवसाचा संप केला होता. त्यांची लोकप्रियता लक्षात घेऊन सरकारनी त्यांना अत्यंत गुप्तरितीने मंडालेला पोहोचविण्याची व्यवस्था केली होती. तरीपण जिथे लोकांना कळत होते तिथे त्यांच्या नावाचा जयजयकार होतच होता. कीर्ती त्यांच्यामागे आपण होऊन धावत होती.

लोकमान्य अत्यंत दीर्घउद्योगी होते. एकाग्र होते. सतत त्यांचे लेखन, मनन, चिंतन चालूच असायचं. ते

कायम विद्यार्थीच होते. त्या वयातही त्यांनी पुस्तकावरुन पाली, जर्मन आणि फ्रेंच भाषा चांगल्याप्रकारे शिकून घेतली.

मंडालेला गेल्यावर त्यांनी पुण्याहून बरेच ग्रंथ वाचनाकरता मागवून घेतले आणि एक वर्षाच्या आत गीतेवरचा 'गीतारहस्य' नावाचा महानग्रंथ लिहून पूर्ण केला. तो विषय त्यांच्या मेंदूत पक्का बसलेला होता. समजा सरकारने तो परत केला नसता तर त्यांनी 'तोच ग्रंथ मी पुन्हा जसाच्या तसा लिहून काढीन', इतका जबरदस्त आत्मविश्वास त्यांचा आपल्या स्मरणशक्तीवर होता आणि तो ग्रंथ आपल्या डोक्यावर घेऊन मॅक्सम्युलर हा जर्मन तत्त्ववेत्ता नाचला होता!

लोकमान्यांची गीता, तुकाराम गाथा आणि दासबोध या तीन ग्रंथांवर नितांत श्रद्धा होती. गीतेतला निष्काम कर्मयोग ते आयुष्यभर जगत होते. मंडालेला गेल्यावर त्या बंदीवासातल्या परिसरात असलेल्या वृक्षवेली तर अगदीच माना टाकलेल्या अवस्थेत होत्या. लोकमान्यांनी त्यांना पाणी दिल्यावर त्यांना जणू संजीवनीच मिळाली. सगळे वृक्ष, वेली, फुलाफळांनी बहरले. तिथलाच एक वॉचमन म्हणतो, 'ह्या अवलियाने ह्या वृक्षवेलींना जीवदान दिले.' त्यांच्या आजूबाजूच्या चिमण्या तर त्यांच्या अंगाखांद्यावर बसायच्या. जणू परस्परांचा एकात्मभाव एकमेकांनी जाणला होता. लोकमान्य जणू तुकारामाचा वृक्षवल्ली हा अभंगच आचरणात आणत होते. जणू आपले अवघे जीवन प्रपंच परमार्थ करूनच त्यांनी देशकार्याला वाहून घेतले होते. सगळं करून काहीच न केलेल्या जीवनमुक्त सिद्धपुरुषाचे जीवन ते जगत होते.

लोकमान्य अंधश्रद्धाळू मुळीच नव्हते, पण श्रद्धाळू निश्चितच होते. काशीतून आणलेला गंडा बांधून घेत होते, प्रायश्चित करून घेत होते. कारण त्यांना मुलाच्या चालीने चालायचे होते. बहुजन समाजात राहून त्यांचा बुद्धीभेद न करता त्यांना आपल्याबरोबर घेऊनच देशकार्य करायचे होते.

लोकमान्य कर्तव्य कठोर होते हे खरे असले तरी त्यांचे हृदय भावशून्य होते. त्यांना नाजूक भावनेचा, वात्सल्य भावनेचा ओलावा मुळीच नव्हता हा समज असेल तर तो चुकीचा आहे. एका राजद्रोहाच्या खटल्यात त्यांना जेव्हा तुरुंगवासाची शिक्षा झाली तेव्हा ते म्हणतात, ''ज्यांना क्रांतिकार्य किंवा देशकार्य करायचे आहे त्यांनी लग्न करायच्या भानगडीत पडूच नये. कारण त्यामुळे मनाची चलबिचल होते. पण आमच्या वडिलांनी आमचा विवाह लहानपणीच केल्यामुळे आमचा नाइलाज झाला.'' परंतु त्या दोघा पती-पत्नींनी एकमेकांना खूपच समजून घेतले होते. जेव्हां काकासाहेब खाडिलकर खूप रडत येऊन टिळकांच्या सौभाग्यवतींना सांगतात की, 'लोकमान्यांना ६ वर्षाची मंडालेची शिक्षा झाली' तेव्हा त्या खाडिलकरांना धीरोदात्तपणे, बाणेदारपणे म्हणतात, ''त्यांना काही फितूरी किंवा चोरीच्या आरोपावरून शिक्षा झाली नाही; तर राजद्रोहामुळेच ना?'' ६ वर्षांचीच ना? मग रडता कशाला खाडिलकर?'' खरोखर लोकमान्यांसारख्या महापुरुषाला शोभेल असेच सत्यभामाबाई अर्धांगिनीचे पद भूषवित होत्या आणि लोकमान्य मंडालेच्या कारावासातून पत्नीच्या मधुमेहाची काळजी घेत होते. पत्रातून त्यांना उपाय सुचवत होते. पण जेव्हा त्यांना त्यांच्या मृत्यूची तार मिळाली तेव्हा मात्र ते कोसळले. प्रत्यक्ष पत्नीच्या मृत्युसमयी आपण तिच्याजवळ नाही ही गोष्ट त्यांच्या मनाला खूप लागली. लोकमान्य पत्रातून आपल्या मुलांची, त्यांच्या शिक्षणाची काळजी घेत होते. पुण्यात असतानाही जेव्हा सवड मिळेल तेव्हा मुलांना अनेक प्रकारे गोष्टी सांगून त्यांच्या ज्ञानात भर घालत होते. त्यांच्याबद्दल सांगू तितके कमीच आहे. ते मुलांना सांगत की, ''मी संध्या करत

---

नाही. संध्या कशाला करायची? तर मनाच्या एकाग्रतेसाठी. मी जेव्हा इझी चेअरवर बसलेला असतो तेव्हा मी आजूबाजूचे सगळे विश्व विसरलेला असतो. माझी सहज समाधीच लागलेली असते.'' जेव्हा वेळ असेल तेव्हा मुलांबरोबर बुद्धीबळ खेळायचे. मुलांना म्हणायचे. ''तुम्ही रोज चहाबरोबर काहीतरी खाता; मी रोज सकाळी पेपर मधल्या लोकांच्या शिव्या खातो!''

त्यांच्यावर एक आरोप केला जातो की, त्यांनी आपल्या मुलांकडे दुर्लक्ष केले. पण ते बरोबर नाही. ते म्हणायचे, 'आगरकर ज्या गल्लीत रहात होते त्या गल्लीतून मी जात नाही. कारण तेथून गेले की जुन्या आठवणी जाग्या होतात आणि मन बेचैन होते.'' त्यांची महानता सांगायची म्हणजे विलायतेला लोकमान्य जाऊन आल्यावर ते एकदा मद्रासला गेले होते. त्यावेळी त्यांना एका प्रसिद्ध देवळात पानसुपारीच्या कार्यक्रमाला बोलावले होते. त्यांचा सत्कार झाल्यावर तिथल्या प्रमुख पुजारी लोकांनी त्यांचा हात धरून त्यांना देवाच्या आतल्या गाभाऱ्यात नेले. तेव्हा लोकमान्य त्यांना प्रामाणिकपणे म्हणाले की, ''विलायतेला जाऊन आल्यापासून मी अजूनतरी प्रायश्चित वगैरे काही घेतलेले नाही.'' तेव्हा पुजारी म्हणाले, ''आम्हाला ते सगळे माहीत आहे. त्याची आपल्यासारख्यांना खरोखर काहीही गरज नाही.'' असे म्हणून लोकमान्यांच्या मस्तकावर देवाचा मुकुट ठेवला आणि मंत्रोच्चार करून अक्षता टाकल्या. खरंच केवढा त्यांच्या कार्याचा गौरव होता हा!

खरोखर आपल्या भारताचे आणि महाराष्ट्राचे भाग्य थोर म्हणूनच लोकमान्यांसारखा अष्टपैलू गुणवान हिरा आपल्याला लाभला. असे लोकमान्य पुन्हा झाले नाहीत आणि होणारही नाहीत. खरोखर, ''झालेत बहु। होतील बहु। परंतु या सम हा।।''

धन्य ते माता-पिता की ज्यांनी अशा लोकोत्तर पुत्राला जन्म दिला. जो स्वकर्तृत्वाने, दिव्यत्वाने तळपत होता. त्या दिव्य तेजाने दिपून जाऊन आपण आपोआप नतमस्तक होतो... आणि 'दिव्यत्वाची जेथ प्रचीती तेथे कर माझे जुळती!!'

**– शैलजा बेडेकर**

(टीप : सदर लेख लोकमान्य टिळकांच्या निधनाला १०० वर्ष पूर्ण झाली त्या निमित्ताने लिहिला आहे.)

## *कालजयी दिनक्रम*

(वृत्तः वसंततिलका, अक्षरे-१४, यती-८,६)

कोविड रोज कळवे नववर्तमान
लाभे, न लाभत कुणा, लसही सुखात ।
टाळेही बंद सगळेच मिळते न वाट
राहून रोज सदनात मन खिन्न होत ।। १ ।।

गाठे कुणास कळते मुकुटी विषाणू
राहे घरात विलगीकरणास कोण ।
कोणा कधी न कळते घडले कसे हे
बाहेर येऊ बघती कसेही करून ।। २ ।।

वाटे कधी न क्रम हा मुळी का चुके ना
वाटे विराम कधी का मजला मिळे ना ।
काही नवे न अगदी मुळी का स्फुरे ना
साऱ्या क्रमात मज का रस सापडेना ।। ३ ।।

नैराश्यय व्यर्थ असते, छळते उगाच
रात्रीस संपवित ये उदयी प्रभात ।
तैसाच काळ छळता, सरता लगेच
येतील 'ते' दिवसही फिरुनी घरात ।। ४ ।।

हा चंद्र रोज उगवे चुकता मुळी न
हा सूर्य रोज क्रमितो क्रम एकलाच ।
वारेही वाहात तसेच थकता मुळी न
तूही कधी दिनक्रमा चुकवू नको न ।। ५ ।।

**– नरेंद्र गोळे**

# मार्गारेट ॲटवूडची 'द टेस्टामेण्टस्': एक डीसटोपीयन कादंबरी

*ज्येष्ठ कॅनेडियन लेखिका मागरिट ॲटवूड यांची 'द टेस्टामेण्टस्' ही २०१९ सालचा बुकर पुरस्कार प्राप्त कादंबरी. या कादंबरीवर प्रकाश टाकणारा डॉ. प्रशांत पुरुषोत्तम धर्माधिकारी यांचा लेख- संपादक*




ज्येष्ठ कॅनेडियन लेखिका मागरिट ॲटवूड यांची 'द टेस्टामेण्टस्' ही २०१९ सालचा बुकर पुरस्कार प्राप्त कादंबरी. यापूर्वी २००० साली 'द ब्लाइंड ॲसेसिन' या कादंबरीसाठी त्यांना 'बुकर' मिळाला होता. परीक्षक मंडळाने नियमांना बगल देऊन कॅनेडियन लेखिका मागरिट ॲटवूड आणि आफ्रो-ब्रिटिश लेखिका बर्नार्डिन एव्हरिस्टो यांच्या पुस्तकांना संयुक्तपणे पुरस्कार जाहीर केला. ॲटवूड यांना 'द ब्लाइंड ॲससिन' या पुस्तकासाठी सन २००० साली बुकर पुरस्कार मिळाला होता. नंतर १९८५ साली त्यांची प्रसिद्ध कादंबरी 'द हँडमेड्स टेल' प्रकाशित झाली. ही कादंबरी डिसटोपिअन अर्थात नजीकच्या काळात येऊ घातलेल्या वाईट भविष्याचे चित्रण करते. या पुस्तकाला देखील बुकरचे नामांकन मिळाले होते. या कादंबरीत पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रियांवर होणारे अनन्वित लैंगिक अत्याचार, तसेच स्त्रीचा उपयोग केवळ पुनरुत्पादनासाठीच केला जातो यावर प्रकाश टाकला. ही कादंबरी प्रचंड गाजली. याच कादंबरीचा उत्तरार्ध २०१९ साली त्यांनी 'द टेस्टामेण्ट्स' या कादंबरीमध्ये मांडला. या कादंबरीत सत्तासंघर्ष व लिंग भेदावर परखड भाष्य केले आहे.

मार्गारेट ॲटवूड यांच्या लेखनाचा परीघ हा बहुआयामी आहे. महिलांवरील अत्याचार व त्यांच्या समस्या, कॅनडाचा इतिहास, पर्यावरण, विज्ञान आणि त्यातील कल्पना, प्राण्यांचे अधिकार, राजकारण अशा विषयांवर त्यांनी लेखन केलं . अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्या कार्यशैलीच्या कट्टर विरोधक म्हणूनही ॲटवूड यांची ओळख आहे. ट्रम्प अध्यक्ष झाल्यानंतर 'द हॅण्डमेड्स टेल' या पुस्तकाचा खप वाढल्याचा दावा ॲटवूड यांनी केला होता. ॲटवूड यांच्याकडून प्रेरणा घेत २०१७ साली कॅनडामध्ये 'द हॅण्डमेड्स कोअलिशन' या राजकीय गटाची स्थापना करण्यात आली. ॲटवूड ह्या पटकथा लेखकही आहेत. त्यांच्या कादंबऱ्यांवर अनेक चित्रपट, मालिका तयार झाल्या आहेत. ॲटवूड ह्या बुकर पुरस्कार पटकावणाऱ्या सर्वात वयोवृद्ध विजेत्या आहेत.

लेखक पंकज भोसले यांचा 'सुन्न समकालीनत्व' या शीर्षकाचा लेख लोकसत्ताच्या ११ ऑक्टोबर २०१९ च्या अंकात प्रकाशित झाला. त्यातील खालील मजकूर मुळातून वाचण्यासारखा आहे.

१९८५ साली प्रकाशित झालेली 'द हॅण्डमेड्स टेल' ही नजीकच्या भविष्यकाळातील आतंकित शहराची काल्पनिक गोष्ट सांगत होती. इंटरनेट, समाजमाध्यमे आणि आत्मसुखाचे महाशोध लागण्याच्या काळाआधी

आलेल्या या कादंबरीमध्ये स्त्रीशोषण-गुलामगिरीसह सरकारी दमनशाहीचे काल्पनिक प्रारूप तयार झाले होते. त्यातील संकल्पनांपासून भाषिक लकबींपर्यंत साऱ्यांचा गौरव झाला. १९९० साली त्यावर एक चित्रपटही आला. पण पुढे काळाच्या पावलांसोबत जगभरातील समाजांमध्ये इतक्या काही आंतर्बाह्य लगबगी होत होत्या की, 'हॅण्डमेड्स टेल' उत्तम मुरलेल्या चविष्ट लोणच्यासारखी या दशकालाही पुरून उरली.

भयावह प्रदूषण, कोलमडलेली कुटुंबसंस्था, ढासळत जाणारा जन्मदर आणि घटती लोकसंख्या या पार्श्वभूमीवर सनातनी ख्रिस्ती धर्माचे पुनरूज्जीवन करू पाहणारा अमेरिकेतला एक बंडखोर पंथ सरकार उलथवून सत्ता ताब्यात घेतो. 'गिलियड' हा नवा देश अस्तित्वात येतो. स्त्रियांना ग्रंथ वाचण्याचाही अधिकार शिल्लक ठेवला जात नाही. घटस्फोट बेकायदेशीर ठरतात. वांझोटेपणा हा फक्त स्त्रीचा दोष मानला जाऊ लागतो. अनेक रानटी शिक्षा पुन्हा प्रस्थापित केल्या जातात. बायबलचा आधार घेऊन अनेक प्रजननक्षम स्त्रियांना सैन्यातल्या आणि यंत्रणेतल्या उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे लैंगिक गुलाम - 'हॅण्डमेड्स'- केले जाते. हॅण्डमेड्सवर त्यांच्या मालकाकरवी विधिवत बलात्कार करवून त्यातून जन्माला आलेली संतती अधिकारी पुरुषाला आणि त्याच्या पत्नीला दिली जाते. या समाजातल्या एका हॅण्डमेडने नोंदवून ठेवलेला तिचा वृत्तान्त गिलियडच्या पाडावानंतर कधी तरी काही संशोधकांच्या हाती आला असल्याचे कादंबरीच्या अखेरीस सूचित केले आहे. हा वृत्तान्त आणि त्यावर नंतरच्या संशोधकांचे भाष्य म्हणजे 'द हॅण्डमेड्स टेल' ही कादंबरी!

२०१७ सालच्या एप्रिलमध्ये या कादंबरीवर आधारित असलेली टीव्ही मालिका प्रदर्शित झाली आणि अल्पावधीतच तिचा प्रचंड बोलबाला झाला. तेव्हा अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदी डोनाल्ड ट्रम्प यांचे आगमन नुकतेच झाले होते. त्यांनी स्त्रियांबद्दल केलेल्या धक्कादायक नि अपमानास्पद विधानांवर माध्यमांचे गुऱ्हाळ जोरात चालले होते. तरीही ट्रम्प यांना मिळालेल्या लोकाश्रयाच्या पार्श्वभूमीवर 'द हॅण्डमेड्स टेल'ची चर्चा होणे स्वाभाविकच होते. मेक्सिकोतून बेकायदेशीररित्या अमेरिकेत आलेल्या स्थलांतरितांना त्यांच्या मुलांपासून वेगळे करण्याचे ट्रम्प यांचे धोरण, अमेरिकेतल्या काही राज्यांमध्ये गर्भपातावर आलेली बंदी या सगळ्या घटना आणि 'द हॅण्डमेड्स टेल'मध्ये घडणाऱ्या घटना यांत चकित करणारे साम्य होते. स्त्रियांच्या अपमानाचा निषेध करणाऱ्या मोर्चामधून मालिकेत हॅण्डमेड्सना दिलेले लाल रंगाचे गणवेश आणि त्यांच्या डोक्यावरची पांढरी झापडवजा टोपी- सतत हे कपडे प्रतीकात्मकरित्या वापरले गेले. आजवरच्या इतिहासामध्ये जगात कुठे ना कुठे स्त्रीच्या बाबतीत खरोखरच झालेल्या अन्यायापलीकडे कोणताही नवा काल्पनिक अत्याचार कादंबरीत न वापरण्याच्या ॲटवूडच्या निर्णयामुळे कादंबरीची धार आधीच कमालीची वाढली होती. त्या गोष्टीच्या सुन्न करणाऱ्या समकालीनत्वाची जाणीव टीव्ही मालिकेने पुन्हा नव्याने करून दिली. मग 'द हॅण्डमेड्स टेल' ही फक्त कादंबरी उरली नाही. एक समाज म्हणून आपण कुठे चाललो आहोत याचे धगधगीत दर्शन घडवणारा तो एक आरसा ठरला.

ॲटवूड यांची 'द टेस्टामेण्ट्स' ही कादंबरी प्रकाशनापूर्वीच बहुप्रतीक्षित होती. याचे कारण म्हणजे २०१७ सालच्या एप्रिलमध्ये 'द हॅण्डमेड्स टेल' या कादंबरीवर आधारित मालिका प्रदर्शित झाली. याचा पुढील भाग कसा असेल याबद्दल लोकांच्या मनातील उत्सुकता 'द टेस्टामेण्ट्स' या कादंबरीच्या रूपाने संपणार होती.

कादंबरीत तीन वेगवेगळ्या वयोगटांतील स्त्रियांचे आत्मकथन एकत्र गुंफलं आहे. आंट लिडीया ॲग्नेस

आणि डेझी या अनुक्रमे गीलियड आणि कॅनडात राहणाऱ्या तरुणींची निवेदने येतात. या तीनही स्त्रिया जुलमी रिपब्लिक ऑफ गीलियड या राष्ट्राला नेस्तनाबूत करण्यासाठी प्रयत्न करत असतात. कादंबरीतील पहिली निवेदिका लिडिया आपलं आत्मकथन आर्डूवा हॉल होलोग्राफ या शीर्षकाखाली लिखित स्वरूपात मांडते तर अन्य दोन निवेदिका आपले आत्मवृत्त मौखिक स्वरूपात मांडतात.

आँट लिडिया आपल्या पूर्वायुष्यातील तिच्या न्यायाधीशाच्या पेशाबद्दल लिहिते. अमेरिकेचे प्रस्थापित सरकार पाडून ख्रिश्चन धर्मावर आधारित रिपब्लिक ऑफ गीलियडची निर्मिती होते. बायबलचा आधार घेऊन तरुण स्त्रिया शासकीय अधिकाऱ्याना लैंगिक भूक भागवण्यासाठी गुलाम म्हणून वाटण्यात येतात. स्त्रियांवर अनन्वित अत्याचार होतात. त्यांना शिक्षण व अन्य मानवी हक्क नाकारून मुलं जन्माला घालणारी वस्तू म्हणून वागवण्यात येते. गीलियड मध्ये वजनदार असलेला कमांडर जुड आँट लिडियाला गीलियड साम्राज्यात स्त्रियांचे शोषण करण्यासाठी मदत करायला सांगतो. जिवाच्या भीतीने ती होकार देते; मात्र मनातून हे साम्राज्य नष्ट करण्यासाठी व्यवस्थेत राहूनच छुप्या पद्धतीने ही व्यवस्था पोखरण्यासाठी सिद्ध होते.

कादंबरीतील दुसरी नायिका ॲग्नेस जेमिमा ही गीलियड साम्राज्यातील एका प्रतिष्ठित कुटुंबात जन्मलेली आहे. तिचं आनंदी बालपण आईच्या मृत्यूनंतर विस्कटतं. ती मोठी होत असतानाच गीलियड साम्राज्यात स्त्रियांवर होणारे अनन्वित अत्याचार आपल्या डोळ्याने पाहते. घरातील बाळाला जन्म देताना हँडमेडचा झालेला मृत्यू जवळून अनुभवते. ॲग्नेसची सावत्र आई तिचं लग्न कमांडर ज्युड बरोबर लावून द्यायचं ठरवते. ॲग्नेसचा याला विरोध असतो. लीडियाची व तिची एक दिवशी भेट होते. लिडियाच्या सांगण्यावरून ती आंट बनते. आंट बनल्यावर तिची त्या लग्नापासून सुटका होते. तिला अन्य स्त्रियांना निषिद्ध असलेलं लेखन व वाचन करता येतं. गीलियड साम्राज्य हे म्हणायला धार्मिक असून बायबलच्या अनेक तत्त्वांची पायमल्ली करून फक्त काही निवडक सत्ताधीशांच्या हातातील बाहुलं बनलं आहे हे तिला उमगतं. गीलियड सत्ताधीशांच्या भ्रष्टाचार व ऱ्हास पावलेल्या नैतिकतेचे पुरावे तिला मिळतात.

कादंबरीतील तिसरी निवेदिका डेझी आहे. ती कॅनडातील टोरंटो इथे वाढली. तिचे पालक मेलानी व नील हे गीलियड साम्राज्याच्या भ्रष्टाचाराचे पुरावे जमा करण्यासाठी मेडे या संघटनेचे कॅनडामध्ये पेरलेले हस्तक असतात. गीलियड साम्राज्यात होणाऱ्या मानवी हक्कांच्या पायमल्ली विरुद्ध आयोजित एका मोर्चा मध्ये डेझी सहभागी होते. मोर्चाला हिंसक वळण मिळते व तिच्यावर हल्ला होतो. त्यातून तिला ॲडा नावाची एक मध्यमवयीन स्त्री वाचवते. डेझीच्या १६ व्या वाढदिवशी तिचे पालक एका अपघातात मरण पावतात. ॲडाच्या मदतीने डेझी मेडे या संघटनेच्या लोकांपर्यंत पोहोचते. ही संघटना गीलियड साम्राज्यातील मानवी हक्काच्या पायमल्लीला वाचा फोडणारी संघटना आहे. डेझीला कळतं किती तिचे खरे पालक मेलडी व नील नसून ती गीलियडमध्येच जन्माला आली होती. या जुलमी वातावरणातून मोकळ्या वातावरणात जीवन जगण्यासाठी तिला एका दाईने कॅनडामध्ये छुप्या पद्धतीने आणले होते. गीलियडचे जुलमी साम्राज्य पाडण्यासाठी कुठल्यातरी मार्गाने तिथे प्रवेश करणे आवश्यक होते. ती गीलियड मध्ये प्रवेश करते व तिची ॲग्नेस व लिडिया यांची भेट होते. लिडिया डेझीच्या दंडावर गीलियड मधील भ्रष्टाचाराच्या माहितीचा दस्तऐवज असणारा मायक्रोडोट म्हणून देते. ही गुपित कागदपत्र व पुरावे घेऊन ॲगनेस व डेझी कशाबशा बाहेर पडतात व कॅनडामध्ये येतात. पुराव्यांच्या

आधारे गीलियड साम्राज्य सत्तेतून बाहेर पडतं. कादंबरीच्या शेवटच्या भागात इसवीसन २१९७ मध्ये एक प्राध्यापक पिक्सोटो या तीनही निवेदिकांनी लिहिलेल्या आत्मकथनांचा अभ्यास करताना दाखवले आहे.

लोकसत्तासाठी या कादंबरीचे परीक्षण लिहिताना पत्रकार पंकज भोसले यांच्या मते, गिलियड या शोषणाधारित दडपशाही राजवटीची अंतर्गत उतरंड कशी काम करते; तिच्या दडपणासमोर मान तुकवताना, सत्तेसाठी झगडताना, सत्ता मिळवताना, वापरताना, पेलताना माणसांची जडणघडण कशी होत जाते; इतर सामाजिक संस्थांमध्ये विकृती कशा प्रवेश करतात; माणसे स्वत:शी कोणकोणत्या तडजोडी करतात आणि आपल्या सदसदद्विवेकबुद्धीला कसकशी सामोरी जातात आणि तरीही माणसे माणसांइतकीच भली नि स्खलनशील कशी उरू शकतात, अशा अनेकानेक प्रश्नांचा थक्क करणारा वेध या कादंबरीत घेतला जातो. कादंबरीच्या शेवटाकडे गीलियडच्या अंताची सुरुवात आहे. शेवटाकडे येताना कादंबरी काहीशी चित्तथरारक, घटनाप्रधान आणि वेगवाग होत गेली आहे. पण कथाभागाला एखाद्या कुमारवयीन साहसकथेचे अविश्वसनीय व सुलभीकृत रंग आहेत. हेच तेवढे 'द टेस्टामेण्ट्स'ला लागलेले गालबोट. तरीही सध्याच्या समाज-विकृतींच्या विज्ञानाचे अचूक वर्णन या कादंबरीमध्ये आले आहे.

द डेली टेलिग्राफच्या सेरेना डेविस यांच्या मते 'द टेस्टामेण्ट्स' म्हणजे एक उत्तम आणि दमदार असा उत्तरार्ध मांडणारी कादंबरी असून एखाद्या गोथिक कादंबरीला साजेशी असणारी व कथानकाला अनेक अनपेक्षित वळणे देऊन वाचकांचा श्वास रोखून धरणारी आहे. स्वतः लेखिकेच्या मते या कादंबरीचा मूळ गाभा हा भविष्याबद्दल आशादायी चित्र निर्माण करणे असा आहे. या कादंबरीला २०२० सालच्या ब्रिटिश बुक ॲवार्डसाठी नामांकन मिळाले होते.

**संदर्भ**

१. https://thebookerprizes.com/booker-prize/news/margaret-atwood-and-bernardine-evaristo-winners-2019-booker-prize-announced

२. पंकज भोसले: सुन्न समकालीनत्व, लोकसत्ता, October 11, 2019 https://www.google.com/amp/s/www.loksatta.com/ athour-mapia-news/the-testament-book-review-abn-97-1990924/lite/

३. https://www.britannica.com/biography/Margaret--twood

४. https://www.sparknotes.com/lit/testaments/summary/

**– डॉ. प्रशांत धर्माधिकारी**
इंग्रजी विभाग,
जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
भ्रमणध्वनी - ९४२२४९५०९४

●●●

**दिशासाठी**

**आपले लेखनसहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन-अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणांकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

# ज्ञानेश्वरी
## (अध्याय : ४)

*माउली ज्ञानेश्वर महाराज रचित भावार्थदीपिकेचा चौथा अध्याय - संपादक*

या अध्यायाच्या सुरुवातीला माउली मंगलाचरण करतात. माउली म्हणतात, 'ही गोष्ट विवेकाची आणि स्वतः भगवान श्रीकृष्ण वक्ता आहेत. म्हणून सर्व इंद्रियांनी आपआपले काम सोडून कानात यावे व हे गीतेचे आख्यान ऐकावे.' माउली म्हणतात,- भगवान श्रीकृष्णाचे अर्जुनावर खूपच प्रेम आहे. कारण जी गुह्य गोष्ट भगवंतांनी आईवडिलांना सांगितली नाही, लक्ष्मीला सांगितली नाही, बलरामदादांना सांगितली नाही, ती गोष्ट भगवंत अर्जुनाला सांगत आहेत.

भगवंत म्हणतात,- अरे अर्जुना खूप वर्षांपूर्वी हाच ज्ञानयोग आम्ही सूर्याला सांगितला. सूर्याने वैवस्वत मनुला व मनुने आपल्या इक्ष्वाकु नावाच्या मुलाला सांगितला. आणखीही काही राजांनी ऋषींनी याचा अभ्यास केला. पण अलीकडच्या काळात लोक विषयासक्त झाले. मोह खूप वाढला. त्यामुळे हा बुद्धियोग (ज्ञानयोग) व त्याचे आचरण लोपल्यासारखे झाले.

तसे तर आपण लढण्यासाठी युद्धभूमीवर आलो आहोत, पण तू माझा अत्यंत आवडता भक्त आहेस. म्हणून तुला झालेल्या अज्ञानजनित मोहाचे निरसन करण्यासाठी मी हा ज्ञानयोग तुला सांगितला. एऱ्हवी हा योग म्हणजे अतिशय गुह्य गोष्ट आहे.

इथे अर्जुनाला एक शंका निर्माण झाली. तो म्हणतो की,- देवा सूर्य कोण हे आमच्या वाडवडिलांनाही ठाऊक नाही इतका प्राचीन आहे आणि तू तर आताच्या काळातला आहेस. मग तू सूर्याला कसा काय उपदेश केलास?

यावर देव म्हणतात,- आतापर्यंत माझे अनेक अवतार झाले व त्या प्रत्येक अवताराची मला आठवण आहे.

ज्या ज्या वेळी धर्माचा ऱ्हास होतो तेव्हा तेव्हा मी माझे निराकारपण बाजूला ठेवतो व धर्मरक्षणासाठी अवतार धारण करतो.

भक्तांच्या रक्षणासाठी मी देह घारण करतो. तेव्हा मी दुष्टांचा नाश करतो. जेव्हा मी अवतार घेतो, तेव्हा पाप नाहीसे होते व पुण्याचा उदय होतो. सत्सुखाने विश्व भरून जाते. जगात सर्वत्र धर्म नांदू लागतो. संतजन सुखी होतात.

माझ्या या अवतार धारण करण्याचं रहस्य जो जाणतो तोच खरा विचारवंत होय.

जे ज्ञानी असतात, तपस्वी असतात, ज्यांचे जगणे माझ्याच सेवेसाठी असते ते माझ्याच स्वरूपस्थितीस प्राप्त होतात.

सर्व जीव माझेच भक्त आहेत. भक्त माझ्यावर जेवढे प्रेम करतात तेवढेच प्रेम मी देखील त्यांच्यावर करतो. पण काही लोक माझ्या स्वरूपात भेद करतात. नाना देवता मानतात व त्यांची नाना प्रकारे पूजा करतात. त्यांना इच्छित फल मिळतेही; पण ते फल त्यांनी केलेल्या कर्माचे फल असते. मी फक्त सर्व उपासनांचा साक्षी आहे. फल मात्र कर्माचेच (भावना) असते.

ही वर्णभेदसंस्था माझ्याच सत्तेने झाली. पण मी केली नाही असे ज्याने ओळखले तोच कर्मबंधनातून सुटतो.

धार्मिक होणं म्हणजे सर्वांभूती परमेश्वर पाहणं.

अर्जुना, कर्म कशाला म्हणतात व अकर्म म्हणजे काय हे तू जाणून घे. चारी वर्णांचे आपआपल्या वर्णानुसार असणारे विशेष कर्म (ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शुद्र यांचे वेगवेगळे आचार), चारी आश्रमांचे (ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ, संन्यासी) विशेष कर्म, त्यांच्यासाठी असणारी व्रते, अनुष्ठाने व त्यांची फले हे सर्व जाणून घेतले पाहिजे. अशा प्रकारे सर्व कर्माकर्मांचे, निषीद्ध कर्माचे ज्ञान असणाऱ्या पुरुषांची लक्षणे भगवंत सांगतात.

सर्व कर्मांचे आचरण करीत असतानाही हे कर्म मी केले असा तो अहंकार धरीत नाही व फलाची आशाही धरत नाही. तो आत्मस्वरूपी स्थिर झालेला असतो. म्हणून बाहेरून जरी तो इतरांसारखा दिसतो तरी तत्त्वतः तो परब्रह्मच असतो. अमुक एक कर्म मी करीन असा तो संकल्पही करत नाही. ज्ञानरूप अग्नीने त्याने आपली सर्व कर्मे जाळून टाकलेली असतात. तो नित्यनिरतिशय आनंदात मग्न असतो. त्याला आपले-परके असे काही नसते. तो कुणाचाही मत्सर, द्वेष करत नाही. तो देहधारी असतो. पण विचार करून पाहिले तर ब्रह्माइतकाच अत्यंत शुद्ध असतो. म्हणून अर्जुना, तो जे जे कर्म करतो ते कर्म ब्रह्मरूपच आहे अशी समबुद्धी त्याच्या अंतःकरणात असते. त्यामुळे त्याने प्राप्त झालेले कर्म केले तरी ते कर्म नैष्कर्म स्थितीला पावते.

जे पुरुष स्वधर्म यज्ञाने यज्ञपुरुषाची सेवा करतात त्यांचे वर्णन भगवंत अर्जुनाला सांगतात -

कुणी आत्मसंयमरूपी अग्नीत काया, वाचा, मन यांचे निग्रहाने हवन करतात. कुणी वैराग्यरूप इंधनाने ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करतात. कुणी सर्व दोषांचे पालन करतात. एक द्रव्ययज्ञ असतो, कुणी तपोयज्ञ करतात. कुणाला योगयज्ञ आवडतो. वेदांचे उच्चारण करणे याला वाग्यज्ञ म्हणतात. ज्ञान प्राप्त करून घेणे याला ज्ञानयज्ञ म्हणतात. काही प्राणायाम करतात या यज्ञक्रिया जरी वेगवेगळ्या प्रकारच्या असल्या तरी त्या सर्वांची फलप्राप्ती एकच 'मोक्ष' असते.

या यज्ञांद्वारा मनातील कामक्रोधादी विकार नाहीसे करून 'मी ब्रह्म आहे' या स्थितीला पोचवतात.

जे लोक अजिबात संयम बाळगत नाहीत त्यांना संसारातही धड सुख मिळत नाही. मग स्वर्गाची (मोक्ष) गोष्ट तर लांबच असते.

सर्व यज्ञ कर्मापासून उत्पन्न होतात. पण या सर्व यज्ञात ज्ञानयज्ञ श्रेष्ठ आहे. त्या ज्ञानानेच आपल्याला आपल्या आत्मस्वरूपाचे दर्शन होते.

असे ज्ञान प्राप्त व्हावे असे वाटत असेल तर संतांनी सर्व भावाने भजावे, प्रथम त्यांची सेवा करावी; शरीराने, मनाने, जीवाने त्यांच्या चरणी लीन व्हावे. शरणागतीपूर्वक, गर्वरहित होऊन त्यांची सेवा करावी. अशा सेवेने ते प्रसन्न झाल्यावर दुःखरूप संसाराच्या निवृत्तीचा व परमानंद प्राप्तीचा उपाय त्यांना विचारावा. ते आपल्याला ब्रह्मात्मैक्य ज्ञानाचा उपदेश करतील तेव्हा आपले अंतःकरण ज्ञानसंपन्न होईल. मनातील संकल्प, विकल्प थांबतील.

भगवंत सांगतात- अर्जुना, जेव्हा श्रीगुरुंची कृपा होईल तेव्हाच तुझ्या अंतःकरणात ज्ञानप्रकाशाचा उदय होईल. तू कितीही पापी, भ्रांत इत्यादी असलास तरी एकदा ज्ञान झाल्यावर तुझा सर्व मोह नाहीसा होईल. ज्ञान हे खूप समर्थ आहे. ते ज्ञान कसे प्राप्त करून घ्यावे हे मी तुला सांगतो. ऐक-

श्रीगुरु व त्यांनी केलेला उपदेश यांवर ज्याची अढळ श्रद्धा असते, त्याला ज्ञानच स्वतः शोधत येते! (श्रद्धेनेच ज्ञान मिळते). त्याला सगळीकडे शांतीच अनुभवाला येते. त्याचा आपपरभाव नाहीसा होतो.

ज्या मनुष्याला ज्ञानप्राप्तीची आवड नाही व इच्छाही नाही तो विषयसुखातच रंगुन जातो. त्याचे मन संशयाने घेरले जाते. त्याला हित-अहित, अनुकुल-प्रतिकुल काहीच नाही. संशय हे फार भयंकर पाप आहे म्हणून यांचा त्याग करावा.

अज्ञानरूपी काळोखाचा (संशयाचा) मार्ग सोडून देऊन श्रद्धेचा मार्ग अनुसरावा. आत्मज्ञानाने संशयाचा संपूर्ण नाश करावा.

माउली ज्ञानेश्वर महाराज म्हणतात,- माझे अर्थभारित असे मराठी बोल ऐका. माझ्या बोलण्यात शांतरस व इतरही सर्व रसालंकार अपूर्वतेने प्रगटतील. माउली याला सूर्यबिंबाची, कल्पवृक्षाची उपमा देतात. माउली म्हणतात ही कथा ऐकल्याने कानांचे पारणे फिटेल व संसारदुःखही आपोआप नाहीसे होईल.

मंत्रानेच शत्रूचा नाश होईल. कडुनिंबाऐवजी दूधसाखरेने रोग जाईल त्याप्रमाणे मनाला न जिंकता, इंद्रियांना दुःख न देता केवळ गीता ऐकण्याने (किंवा वाचनाने) आयता मोक्ष प्राप्त होईल. म्हणून प्रसन्नतेने, उत्कंठतेने कथा ऐका.

**- भाग्यश्री कुलकर्णी**

•••


दिशा नियमित वाचा.

*आपली मते जाणून घेण्यास आम्ही उत्सुक आहोत.*


# भावपूर्ण श्रद्धांजली



**श्रीमती शैलजा बेडेकर**

**(जन्म : १३ नोव्हेंबर १९४५ - मृत्यू : २० जुलै २०२१)**

जन्मतःच अपंगत्वामुळे शारीरिक हालचालींवर मर्यादा असूनही ठाण्यात गेली पाच दशके मनोरंजन वाचनालयाचे व्यवस्थापन आणि 'स्वयंसिद्ध' संस्थेच्या वतीने अपंग पुनर्वसनासाठी विविध उपक्रम राबविणाऱ्या शैलजा बेडेकर यांचे अल्पशा आजाराने २० जुलै २०२१ला निधन झाले.

शहरातील वैद्यकीय आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या बेडेकर कुटुंबातील शैलजा यांनी संस्कृत आणि मराठी विषय घेऊन एम.ए.पर्यंत शिक्षण घेतले. वाचनाची आवड असल्याने १९७० च्या दिवाळीत त्यांनी मनोरंजन वाचनालय सुरू केले. गेल्या दिवाळीत या वाचनालयास ५० वर्षे पूर्ण झाली. वाचनालयातील सभासदांशी त्या नियमितपणे संवाद साधत. अनेक मान्यवर लेखकांनी मनोरंजन वाचनालयास भेट दिली. 'स्वयंसिद्ध' या संस्थेद्वारे त्यांनी ठाणे शहरात अपंग पुनर्वसनासाठी अनेक उपक्रम राबवले. गृहोपयोगी वस्तू, खाद्यपदार्थ बनवून त्यांनी विक्री केली. त्यातून अपंगांना काही प्रमाणात उत्पन्न मिळाले. सदैव हसतमुख असणारे हे व्यक्तिमत्त्व अनेकांसाठी प्रेरणादायी ठरले. त्या अखेरपर्यंत कार्यरत होत्या.

अज्ञानामुळे तमोगुण निर्माण होतो.

# एस. टी. कोलरिज या इंग्रजी कविला उद्देशून-

*प्रख्यात इंग्रजी कवी एसटी कोलरीज त्याला उद्देशून लिहिलेले साहित्यिक अभिरुची संपन्न करणारा डॉ. आनंद कुलकर्णी यांनी लिहिलेला लेख - संपादक*

प्रिय कोलरिजभाऊ,

रामराम

तुझ्याशी चार गोष्टी बोलायच्या होत्या म्हणून लिहितोय हे. आमच्याकडे चार गोष्टी म्हणजे चार गोष्टी नसतात भाऊ. तुला पाल्हाळ वाटल पण आम्ही असंच बोलतो. तवा रागावू नको. ऐकून घे, तुझ्या हिताचं बोलतोय.

आम्ही सगळेच कवी-बिवी हायेत बरंका भाऊ. म्हणजे आम्हाला कविता कधीबी होते. अन् आमची कविता असो, नाहीतर दुसऱ्याची, कविता आम्हाला एकदम साधी, सरळ लागते. समजायला सोपी असावी. म्हणजे फक्त कविताच नाही तर सगळंच साहित्य. तुला वाटल हे काय इपरित. मलाही अशी निरागस आणि निष्पाप विधानं ऐकली/वाचली की जाम मज्जा येते. पराकोटीची निरागसता असते अशा समजूतींमधे. इंग्रजीत ज्याला 'नाइव्ह' म्हणतात ती ही निरागसता. मग मला सर्व भारतीयांना अतिप्रिय असलेली विल्यम वर्डस्वर्थ या कवीची 'डॅफोडिल्स' ही कविता आठवते. वर्डस्वर्थला लोकांच्या भाषेत, सगळ्यांना समजेल अशी, आणि रोजच्या जीवनावर आधारित कविता लिहायची होती. तशी त्याने लिहिली सुद्धा. म्हणजे त्याचा तसा दावा होता की, त्याची कविता साधी आणि सोपी आहे. असतात एकेकाचे फॅड. त्याला आपण काय करणार? आता हा वर्डस्वर्थदादा असं साधेपणाचं फॅड घेऊन बसला. कोलरिजभाऊ, तू तर त्याचा सख्खा मित्र ना! पण तू वेगळीच पुंगी वाजवली!! कविता वृत्तबद्ध रचना असते असं म्हणाला तू कोलरिजभाऊ. तर कविता बंधनांपासून मुक्त असलेली अभिव्यक्ती असं वर्डस्वर्थदादाचं मत. भांडणं करून घेतली राव तुम्ही दोघांनी! सख्खे मित्रं, पण कवितेपायी वेगळे झाले. बाकी मला नेहमी असं वाटत आलं की, तू आणि वर्डस्वर्थदादाने कोपऱ्यात जाऊन काहीतरी सुला काढावा. नाहीतर गावातून फेरी मारून येऊन 'आपलं मिटलं बुवा' असं सांगावं. म्हणजे कसं आपल्या डोक्याची कल्हई गेली. नाहीतर दोघांचे भांडण तिसऱ्याला ताप! कोलरिजभाऊ तू तर लई डांबिस निघाला राव. कवितेचं पहिलं काम वाचकाला आनंद देणं आहे असं म्हणतो तू, अन् कसली कविता लिहितो तर 'Kubla Khan'. काय कविताय, डोकं फुटायचं काम. ही कविता रोमँटिसिझमच्या काळातील सर्वोत्तम कवितांपैकी एक आहे असं म्हणतात सगळे इंग्रज. येडे समजले की काय आम्हाला. इंग्रजांनो आणि भारतीय इंग्रजांनो, असं फसवायचं नसतं भौ. आम्हाला कळतं समदं. ह्या कवितेच्या जन्माविषयी तर लै घोळ घातलाय इंग्रजांनी. अफूच्या अंमलाखाली तू ही कविता लिहिली असं सगळे सांगतात! नशा चढल्यावर अशी बेताल आणि विसंगत कविता जन्माला येणार नाही तर काय होणार मग? आमच्याकडे बघ, नशापाणी न करताच कवितेची अशी झिंग चढते आम्हाला, की मग त्यातून कानामनाला तृप्त करणारे भारंभार शब्द बाहेर पडतात. तुझी ही स्वप्नातली कविता आहे म्हणं. स्वप्नातली कुठं कविता असते का राव? बरं असंना का स्वप्नातली पण स्वप्न तर जरा रोमँटिक दाखवायचं. अरं कोलरिजभाऊ, थोडा रोमान्स लिहायचा स्वप्नातला-

स्वप्नात साजना येशील का असं काहीतरी. थोडं चटपटीत, मसालेदार वर्णन करायचं राव स्वप्नाचं. आमची तब्येत खुश करायची. तू बसला येड्यासारखं काही बरळत. आम्हाला सगळं कसं सुसंगत, क्रमवार लागतं. एकानंतर एक- उखाण्यांसारखं. तू तर वाटच लावली आमची. अरे तो कोण कुबला खान, त्याचा कुठला राजवाडा, कशाला त्याला आनंदाचा राजवाडा बांधायचाय. ते झानाडू नावाचं ठिकाण. नावापासूनच बोंब. कशाला पाहिजे हे असं येडछाप नाव अन् गाव तुला. काहीतरी विग्लींश नाव लिहून आम्हाला मोकळं करायचं. तू बसला फर्राटे मारीत. ती मधेच गाणारी बाई काय आणतोस अन् ते युद्धाचे ढोल मधेच काय बडवतोस. बरं आणनास का पण बाईला जरा जास्त वेळ गाणं गाऊ द्यायचं. युद्धाचं बघितलं असतं नंतर! तेवढीचं आमची करमणूक. तुम्ही लई बावळट राव. ते बॉलिवूडवाले बघा. जरा खूट झालं की हायच आयटम साँग. बघणारे रंगलेचं. ह्याला म्हणायचं सोप्प, आनंद देणारं. कोलरिजभाऊ, तू अनाडी राहिला राव. अरे कम्बख्त सपना तो अच्छा देख लिया होता. आमच्याकडे बघ, कसले जिगरवाले फॅन हौत आम्ही. आमचं स्वप्न कसं असतंय सांगू का तुला?

ख्वाबों में छुपाया तुमको
यादों में बसाया तुमको
मिलोगे हमें तुम जानम
कहीं ना कहीं

असं असतंय. असं स्वप्नाचं गाणं लिहायचं सोडून तू काय मगजमारी करतो भाऊ. बरं, हे गायलं कुणी माहितीय का- द ग्रेट कुमार सानू आणि शब्द आहेत समीरचे. जरा शिक भाऊ ह्यांच्याकडून. तू त्या गुलजारांसारखं अवघड काहीतरी लिहितोस आणि पुन्हा गायला मन्ना डे. मन्ना डे म्हणजे तुझे समीक्षकं रे. एका येड्या समीक्षकानं तर या कवितेवर 'द रोड टू झानाडू' असं पुस्तकच लिहिलं. आता मरायला इथं कविताच कळंना, बोंबलायला पुस्तक कशाला लिहायचं ह्यानं? मला सांग तू कोणत्या इंग्रजीच्या गुर्जीला ही कविता कळलीय? मग गुर्जी पोरांना काय सांगणारं? अरे कुछ तो गुर्जीका खयाल किया होता यार! एकतर कळंल अशीच कविता लिहावी माणसानं नाहीतरी गप पडून राहावं!! कशाला लोकांच्या डोक्याचा भुगा करायचा? इथं कुणाचं काही अडलंय का कोलरिजभाऊ. चणेफुटाणेवाली कविता लिहायची. टाळ्या, हशा मिळवायच्या. जनता खुश आपण खुश. मस्त मजेत जगायचं. अरे आम्ही 'हर अच्छी कविता को धुएँ मे उडानेवाले' लोक आहोत. त्या वर्डस्वर्थदादाकडं बघं. काय कविता लिहितो वर्डस्वर्थदादा. त्याच्या 'डॅफोडिल्स' कवितेतील ओळी वाच. डॅफोडिल्सची फुलं बघितल्यावर वर्डस्वर्थदादाला किती आनंद झाला. त्याने त्याचा आनंद व्यक्त करण्यासाठी प्रतिमांची झडच लावली. आणि अशी झड की ज्यात मनमुराद आनंद देणाऱ्या साध्या शब्दांचे नुसते फव्वारे आहेत. अरे नर्सरीतील पोरांनाही कळेल अशी ही कविता. भारतातले सगळे पोरं आणि गुर्जी ह्या कवितेवर लट्टू. का असू नये माणसानं. आधीच साधं, त्यात सुंदर. म्हणजे साधेपणातलं सौंदर्य. ते सगळ्या भारतीय माणसांना आवडतं. आम्हाला न कळताच कोणतीही गोष्ट आवडते. कविता तर काय तंबाखूचा बार भरण्यासारखी गोष्ट असते. आणि वर्डस्वर्थदादाने आमचे असे लाडकोड प्रेमाने पुरवले. कोलरिजभाऊ, लै अवघड लिहिलंस तू. आणि कवितेत एवढा जीव काढून शेवटी रिकाम्या हाताने गेलास ना! काय मिळालं तुला? हे सगळे साधेपणा आवडणाऱ्या वाचकांचे शाप आहेत तुला! तो वर्डस्वर्थदादा बघ. चांगलं घसघशीत ऐंशी वर्षांचं आयुष्य जगला आणि जाताना राजकवी म्हणून गेला! याला म्हणायचं साधेपणातलं सौंदर्य!!

'डॅफोडिल्स' कित्ती साधी कविता. ह्या कवितेच्या

शेवटच्या कडव्यातील पुढील ओळी वाचल्या का तू?

For oft, when on my couch I lie
In vacant or in pensive mood,
They flash upon that inward eye
Which is the bliss of solitude;

मला खूप आवडतात या ओळी; अर्थात त्यांच्या साधेपणामुळे. कोलरिजभाऊ, बघ वर्डस्वर्थदादा साध्या शब्दांतून केवढा सोप्पा आशय व्यक्त करतो. डॅफोडिल्सचं वर्डस्वर्थदादाला खूप कौतुक. या ओळीत तो असं म्हणतो की, तो जेव्हा एकटाच कोचावर पहुडलेला असतो तेव्हा त्याला डॅफोडिल्सची फुलं आठवतात. त्याचा मूड कसाही असो- विचारमग्न किंवा शांत- डॅफोडिल्स त्याला आठवतातच. पुढच्या दोन ओळी तर कमाल साध्या आहेत. म्हणजे मोनालिसाच्या स्मितहास्यासारख्या. डॅफोडिल्स वर्डस्वर्थदादाच्या अंतर्मनात डोकावतात. आता वर्डस्वर्थदादा 'inward eye' असा शब्द वापरतो. 'inward eye' म्हणजे- मन, आठवण, स्वप्न, आध्यात्मिक अनुभव आणि अजून बरंच काही. (पण एवढे अर्थ लावायचे नसतात बरं का! जो अर्थ पुस्तकात सांगितलाय तो गोड मानून घ्यायचा. नाहीतर स्वभावाप्रमाणं तू नसत्या उचापती करायला जाशील!) डॅफोडिल्सच्या आठवणीत वर्डस्वर्थदादा रमून जातो. एकटा असला तरीही त्याला डॅफोडिल्सची सोबत जाणवत राहते आणि अशी सोबत त्याला खूप आनंद देते. यासाठी तो 'bliss of solitude' असा शब्द वापरतो. एकांतवासातील आनंद. एकांतवासात आनंद मिळणं ही सहज घडणारी गोष्ट नाही. आधीतर असा एकांतवास कुठे मिळणार? म्हणजे जिथं आपल्याला कोणी डिस्टर्ब करू शकत नाही असं ठिकाण कुठे शोधणार? आणि मिळालाच असा एकांतवास तर त्यातून आपल्याला आनंदच मिळेल कशावरून? शिवाय वर्डस्वर्थदादा म्हणतो तो आनंद साधा नाही. तापलेल्या उन्हात आपण डेरेदार आंब्याच्या सावलीत बसलोय आणि अचानक आंब्याचा पाड हाती लागावा आणि तो आपण चवीने खावा! यातून जो आनंद मिळतो ना तो वर्डस्वर्थदादाचा आनंद नाही. तो आहे स्वर्गीय आनंद. त्याचा शब्द बघ ना 'bliss'. 'bliss' म्हणजे उच्चं स्तरावरचा आध्यात्मिक आनंद. आता असा आनंद आपल्यासारख्या वाचकांना कुठून मिळणारं? त्यासाठी वर्डस्वर्थदादासारखं प्रतिभाशाली कवी असावं लागतं नाहीतर संत असावं लागतं. अरे, म्हणजे वर्डस्वर्थदादा फसवतोय राव आपल्याला! रोजच्या वापरातील शब्दांत सोपा अनुभव सांगणार आहे असं म्हणाला होता वर्डस्वर्थदादा. आता हा काय सोपा, साधा अनुभव आहे का? वर्डस्वर्थदादा तर तुझ्याच वळणावर गेला कोलरिजभाऊ. शब्द सोप्पे असून चालतं का वर्डस्वर्थदादा? शब्द सोप्पे असतीलही; पण ते जो अनुभव व्यक्त करतात तो सोप्पा, साधा नसतो ना! शब्द साधे पण आशय अवघड! ह्या सगळ्याचं मूळ वर्डस्वर्थदादाने कवितेची जी व्याख्या केलीय त्यात सापडतं. कवी त्याच्या निश्चल आणि स्थिर मनात साठवलेल्या भावनेतून आपली कविता व्यक्त करतो अशी वर्डस्वर्थदादाची कवितेविषयी समजूत आहे. कविता म्हणजे काय हे सांगायला किती जड शब्दं वापरले दादाने. ते असो. पण अशा समजुतींमुळे वर्डस्वर्थदादाला आठवणीतील डॅफोडिल्स एकटेपणात सुद्धा आनंद देतात. आता ही समजूत आणि अशा समजुतीतून मिळणारा आनंद वर्डस्वर्थदादा कितीही म्हणत असला तरी आमच्यासारख्यांसाठी अवघड आहे. असं गोड बोलून फसवायचं नाय रे वर्डस्वर्थदादा!

तुला माहितीय का कोलरिजभाऊ, पुढे इलियट तात्याने (टी. एस. इलियट) वर्डस्वर्थदादाची 'साध्या शब्दांत सोप्पा आशय' ही लबाडी उघड केली. इलियट तात्याच्या मते वर्डस्वर्थदादाचा कवितेचा फॉर्म्युलाच

चुकीचा आहे. कविता म्हणजे भावनांची मुक्त अभिव्यक्ती नाही; तर अशा भावनांपासून अलिप्त राहणं आहे. कवितेत कवीची भावना नसते; असते ती सार्वत्रिक भावना. कवितेत तत्त्वज्ञान पाजळायचं नाही म्हणाला तात्या. इलियट तात्यानं असं लै काहीबाही लिहून वर्डस्वर्थदादाला खोटं ठरवलं राव! साधं, सोप्प आवडणाऱ्या आम्हाला वाईट वाटलं. असं लोकांच्या भल्यासाठी लिहिणाऱ्या कवीला नावं ठेवणं बरं दिसतं का? बरं एवढं करून इलियट तात्या गप बसला नाही. त्यानं बी लै अवघड कविता लिहिल्या. पुन्हा आमची पंचाईत! विचारलं तर म्हणला, 'मला माहिती नाही कवितेचा अर्थ. तुमचा तुम्ही शोधा!' आम्ही म्हणतो जे समजतच नाही ते लिहायचं कशाला? पण इंग्रजांना तात्याच्या कविता लै आवडल्या. अवघड लिहिणारा इलियट तात्या डोळ्यांदेखत मोठा झाला.

कोलरिजभाऊ, इकडं आमच्याकडं मराठीत बी लै सोप्प लिहिलंय कवींनी. मंगेश पाडगांवकर खूप सोप्या आणि सुंदर कविता लिहितात. आवडतात आम्हाला सगळ्यांना. पण मला प्रश्न पडतो की, त्यांच्या लोकप्रिय कविता तरी आम्हाला कळतात का? पाडगावकरांचं हे प्रसिद्ध गीत उदाहरण म्हणून बघ–

भेट तुझी–माझी स्मरते अजुन त्या दिसाची
धुंद वादळाची होती रात्र पावसाची

आम्ही खूप काळापासून हे गीत ऐकत आलोय. हे गीत/कविता खूप साध्या शब्दांत प्रेम भावना व्यक्त करते. प्रेम किती तीव्र, ओढाळ आणि अनिर्बंध असतं त्याचं उत्कट वर्णन यात आलंय. प्रियकराला प्रेयसीची झालेली भेट आठवते. बाकी वर्णन आहेच भेटीचं. पण या पुढच्या ओळींचं काय करायचं हा प्रश्न आहे–

सुगंधीच हळव्या शपथा, सुगंधीच श्वास
स्वप्नातच स्वप्न दिसावे तसे सर्व भास
सुखालाही भोवळ आली मधुर सुवासाची

यातले शब्द किती साधे आहेत बघ. पण अर्थ? तो साधा नाही. शपथा सुगंधी आणि हळव्या आहेत आणि श्वासही सुगंधी आहे. नंतर इलाही जमादारांनी जखमाही सुगंधी असतात असं लिहिलं. काय समजायचं आम्ही? का नेहमी आम्ही करतो तसं ऐकून, गुणगुणून सोडून द्यायचं? स्वप्नातच स्वप्न दिसणं आणि सुखाला भोवळ येणं या प्रतिमा सोप्या आहेत? वाचकाने काही–एक संदर्भ लावल्याशिवाय या प्रतिमांना अर्थच मिळत नाही. जेवढे वाचक तेवढे अर्थ! आणि जेवढे अर्थ जास्त तेवढी कविता अनेकार्थी होत जाते. म्हणजे कवितेला स्वतःचा असा अर्थ नाही. मग आम्ही नक्की कशाला सोप्प आणि साधं म्हणतो? साधे शब्द किती फसवे असतात ना कोलरिजभाऊ?

पण तुला सांगू का आमच्याकडे सगळ्यात मोठा लोचा कोणी करून ठेवला ते? मर्ढेकर साहेबांनी. हे साहेब इलियट तात्याचे भक्त. मग काय! आधुनिकतेच्या नावाखाली गोंधळ घातला नुसता. उलटं पालटं लिहिलं सगळं. कशाचा ताळमेळ कशालाही नाही. आम्हाला सवय नाही रे अशी खोल डोही डुबक्या मारायची. जीव गुदमरतो आमचा. आम्हाला नाही तर उंदरांना का होईना मर्ढेकरसाहेबांनी ओल्या पिपात घालून मारलं! आम्ही तवा धरून शोधतोय हे पिपात उंदीर मेले कसे काय? अजून तपास नाही. मर्ढेकर साहेबांनी आमची सोपी कविता जी गायब केली ती अजून गवसत नाही. बरं आम्हा सगळ्या भारतीयांना कविता आवडतेच आवडते. त्यामुळे ती वाचायची पण सक्ती आहे आणि न कळायची पण सक्तीच आहे! मर्ढेकर साहेब तुमच्या कवितेनं आमचं डोकं उठवलं म्हणून तुमच्यावर खटला भरायला पाहिजे होता.

त्या विलास सारंगांनीही असाच घोळ घातला. ते

बहुतेक मर्ढेकर साहेबांचे चेले असावेत. ते अतिशय वेगळ्या प्रकारचं आणि प्रयोगशील लिहायचे म्हणं. 'एन्कीच्या राज्यात' असं पुस्तक लिहिलं त्यांनी. आता हे आम्हाला कसं कळणार कोलरिजभाऊ? हे एन्की म्हणजे कोण आणि त्यांचं कुठलं राज्य? एन्की म्हणजे सुमेरियन लोकांचा देव होता म्हणं. आता सारंगांनी तरी देवासाठी एवढ्या लांब कशाला जायचं बरं? आपल्याकडे काय कमी आहे का देवादिकांची? घ्यायचं एखादं नाव आणि लिहून काढायचं पुस्तक! सारंग लै प्रयोग करत बसले. या पुस्तकात अस्तित्वविषयक प्रश्न मांडलेत म्हणं. लै अवघड. इथं हाय तेच वाचायचा प्रॉब्लेम! हे असलं जड जड कोण वाचणार? बघ सारंग कसं लिहितात-

कवी-बीवी
लिहितात-बिहितात
बूट-बीट
झिजतात-बिजतात
तारा-बिरा
तुटतात-बिटतात

अशी कविता वाचल्यावर आपलं तर डोकंच काम करत नाही. असं रिपीट शब्द तर आम्ही रोज वापरतो- खाणं-बिन, बघणं-बिघन, चालणं-बिलन. मग काय अशी कविता हुते का राव? बरं ह्या सारंगांना थेट सॅम्युअल बेकेटनं नावाजलं होतं म्हणं. लै मोठा गडी. जगभर नाव झालं ह्यांचं, पण इथं आम्हाला कायबी फरक पडला नाय. आम्हाला कळंल असं लिहिलं नाही मग काय उपयोग? तुला सांगतो कविता आइस्क्रीमसारखी असली पाहिजे. चावायचा सुद्धा त्रास नको. अशी सहज घशाखाली गेली पाहिजे. सारंग तर आम्हाला वाचायला लावतात. बहोत नाइन्साफी है। सारंग, तुम्ही आमचे टी. व्ही. वरचे कलाकार ऐकले नाहीत. नाहीतर तुम्ही असं अवघड लिहायचं धाडस केलं नसतं. टी. व्ही. च्या पडद्यावर कलाकार अशा उत्स्फूर्त कविता सादर करतात की बस्स! आमचे डोळे पाणावतात, ऊर भरून येतो. कित्ती कित्ती रे कलाकारांनो तुमचं कौतुक करावं. तुम्हाला काय काय येतं राजेहो- अभिनय, गाणं, नाचणं, बोलणं आणि वर कविता. म्हणजे आईसिंग ऑन द टॉप. एकही तो दिल है कितनी बार काटोगे यार! सारंग, अशी सोप्या शब्दात कविता लिहून नाचत, गात म्हणायची असते. काळजाला भिडते हो आमच्या. अवघड लिहून चुकलात तुम्ही! बरं, आम्हाला कळत नाही म्हणून सारंगांना जागतिक लेखक वगैरे म्हणायची इकडं सोय नाही. लगेच रा. रा. भालचंद्र नेमाडे सरांना राग यायचा. कोलरिजभाऊ तुला माहीत आहे का, रा. रा. नेमाडे सर कोणालाही जागतिक लेखक वगैरे मानत नाहीत. अगदी श्रीमान शेक्सपियर रावांनासुद्धा नाही! त्यांच्या मते कोणताच लेखक जागतिक वगैरे नसतो, तो त्याच्या भाषेपुरता मोठा असतो. आम्ही पामर वाचक यावर काय बोलणार? बरं, स्वतः रा. रा. नेमाडे सरही काही साधं, सोपं लिहीत नाहीत. त्यांच्याही कविता कळायला अवघडच. ही बघ त्यांच्या एका कवितेची सुरवात-

पिंगट रानाला राघू सोडून चालले
डोंगराच्या रांगाही उडू पाहतात पायथे उचलून
फांद्यांनी पारंब्या रोवल्या माझ्या डोळ्यांत तळापर्यंत
देठ... देठांचा स्पर्श आहे अजून
पाने... पानांची टोके जमिनीला दूर हो दूर हो म्हणतात
खाली पोकळी करून दे म्हणतात, नाही सोसवत.

शब्द साधे असले तरी ही कविता सोपी नाहीच. इथे काही फक्त रानाची कैफियत नाही. इकोसिस्टिम बिघडलीय एवढंच ही कविता सांगत नाही. ती अजून बरंच काही सुचवते. मूल्य ऱ्हास आणि आदर्शांची पडझड सांगते. म्हणजे डोक्याला खुराक आलाच का नाही?

रा. रा. नेमाडे सरही अवघड कविता लिहितात. सोप्प लिहिलं असतं सर तर तुमच्या कवितांची गाणी झाली असती आणि आम्ही ती गुणगुणत आयुष्य काढलं असतं!

आता हे एवढ्यावरच थांबत नाही बरं का कोलरिजभाऊ! आता बदल म्हणून कादंबरीचं उदाहरण घेना. तुला आमचे किरणभाऊ नगरकर माहितीय्त का? त्यांनी 'सात सक्कं त्रेचाळीस' अशी कादंबरी लिहिली होती. किरणभाऊ आम्हाला, म्हणजे मराठी वाचकांना, हे पुस्तक कळालं नाही म्हणून नाराज झाले. आता साधी गोष्ट आहे भाऊ. सात सक्कं त्रेचाळीस असतं का? आम्ही लहानपणापासून टेबलं (पाढे हो!) शिकलोय. आम्हाला काय गणित येत नाही का? सात सक्कं त्रेचाळीस नाही, बेचाळीस असतं. तू सांग, चूक आमची आहे की किरणभाऊंची? पुढे आमच्यावर नाराज होऊन किरणभाऊ इंग्रजीत लिहायला लागले. लिहू द्या, आम्ही काय करू? तिकडं 'रावण अँड एडी' असं पुस्तक लिहिलं. रावणासोबत कुठं एडी असतो का किरणभाऊ? जाऊ द्या. मराठीत वेगळ्या विषयावरची पुस्तकं नाही आली तर आमचं काय बिघडतंय? आम्हाला सोप्प वाचायला द्या, विषय संपला!

पण कोलरिजभाऊ आमचा खरा प्रॉब्लेम केला मिस्टर ग्रेस यांनी. काय लिहितात की आणि काय सांगायचं असतं की त्यांना त्यांचं त्यांना ठाऊक! लै म्हणजे लै अवघड लिहितात राव. त्यांच्या कविता वाचताना न संपणाऱ्या बोगद्यातून प्रवास केल्यासारखं वाटतं! सगळीकडे अंधार, अनिश्चितता, भीती, दुःख असतं. कुठे जातोय ते कळत नाही आणि कशासाठी जातोय तेही कळत नाही. अशी त्यांची कविता. वाचतो तो झोपतोच! ग्रेसांनी सोपी कविता लिहिली असती तर आज ते शेलेब्रिटी असते. पण 'क्षितीज जसे दिसते/ तशी म्हणावी गाणी' असं लिहिलं त्यांनी. आता असं लिहिल्यावर कसं कळणार आम्हाला? क्षितिज दिसायला आम्ही काही ज्ञानोबा-तुकोबा आहोत का?अरे, कवितेचा चिवडा करून चिल्लरात जगलेली माणसं आम्ही! तेजाची लेणी दिसायला, खुराड्यातून 'बाहेर' पडावं लागतं. 'उमराव जान'मधे गाणाऱ्या आशाबाईं सारखं लिहितात ग्रेस. आम्हाला नेहा कक्करने गायलेलं आवडतं. नेहाच्या गाण्याची 'ग्रेस' आशाबाईंच्या गाण्याला कुठून येणार? ग्रेसांनीही नेहाच्या गाण्यासारखं लिहायला पाहिजे होतं. प्रत्येक गोष्टीचं 'टायमिंग' असतं ग्रेस. तुम्ही निवांतपणे अस्वस्थतेची स्तोत्रं गायली. आम्हाला फास्ट फॉरवर्ड असलेला उडता सुकुन लागतो. त्यामुळे या कटकटीला वैतागून आम्ही सोपी गोष्ट केलीय्. आम्ही तुमच्या कविता समजून घ्यायचंच सोडून दिलंय!

कोलरिजभाऊ, कळलं का तुला आता सोप्प का लिहायचं असतं? अरे; साधे शब्द, देखण्या प्रतिमा वापरून कविता अशी फुग्यांसारखी उडवायची असते. तुझ्यासारखी अवघड कविता असली की सगळंच संपलं. आम्हाला एकतर वेळ नाही, दुसरं म्हणजे वाचायची आवड नाही, आणि तिसरं म्हणजे आमच्या डोक्याला ताप आणि ताण द्यायचा नसतो! अवघड लिहिणं सोपं असतं आणि सोपं लिहिणं अवघड असतं असं सगळे म्हणतात. हे सदाबहार वाक्य आहे आणि हे वाक्य आम्ही सतत एकमेकांच्या तोंडावर फेकत असतो. गंमत म्हणजे काहीही न वाचणारे सुद्धा असं म्हणतात! आता हे काय खोटंय का सांग? अरे, सगळे म्हणतात म्हणजे खरंच असलं पाहिजे. आम्ही तर सगळे काय म्हणतात तेच ऐकतो! आमचं डोकं लावत नाही! गरजच काय त्याची? लोकप्रियता आणि गुणवत्ता काही वेगळ्या नसतात. स्वतःला विकता यायला हवं. त्यासाठी कौशल्य लागतं. ते असंच येत नाही. त्यासाठी साधे शब्द, सोप्या भावना ओठी असाव्या लागतात. मगच कविता

(पृष्ठ क्र.२२ वर)

# निसर्ग, सामान्य विज्ञान ते ... ऊर्जा

*कोळसा सद्या ऊर्जेसाठी औष्णिक विद्युतगृहात मोठ्या प्रमाणात उपयोगात आणला जातो. कोळशाबद्दल महत्त्वपूर्ण माहिती या लेखात दिली आहे - संपादक*

'कोळसा'! 'कितीही उगाळला तरी काळाच!' असं काहीसं बिरुदावली मिरवणारे हिणकस शब्द. मात्र त्याच्यातल्या ऊर्जेनं आणि उपयोजितेनं तो 'हिरा' ठरतोय! सद्या ऊर्जेसाठी औष्णिक विद्युतगृहात तो मोठ्या प्रमाणात उपयोगात आणला जातो. वास्तवात, जमिनीच्या गर्भात अब्जो वर्षांच्या उलथापालथी नंतर तयार झालेला कार्बनिक जीवाश्मच तो.

भारतात आढळणारा दगडी कोळसा हा 'ड्रीफ्ट थिअरी' प्रमाणे तयार झालेला आहे. यानुसार पुराच्या पाण्यासोबत वाहून आलेले मोठमोठे वृक्ष, झाडेझुडूपे पूर ओसरताच एखाद्या खोलगट भागात जमा होऊन त्यावर रेती व गाळ साचतो. असे वर्षानुवर्षे होऊन अशाप्रकारचे एकावर एक याप्रमाणे अनेक थर रचले जातात. त्यामुळे प्राणवायु विरहीत अवस्था आणि वरच्या दाबामुळे या वृक्षांचे कोळशाच्या जीवाश्मात रूपांतर होते. आपल्या देशात अशा प्रकारच्या दगडी कोळशांचे साठे गोदावरी, वर्धा, महानदी, पेंच, दामोदर, सुवर्णरेखा, ईब, कन्हान, जाम, जोहिल्ला आदी नद्यांच्या खोऱ्यात विपुल प्रमाणात आढळून येतात. थोडक्यात, दगडी कोळसा म्हणजे निसर्गाचं देणंच. भूगर्भशास्त्रानुसार 'गोंडवाना पिरिएड' हा याचा उत्पत्तीकाळ.

दगडी कोळशाचे 'खुली' व 'भूमीगत' या दोन प्रकाराने उत्खनन करण्यात येते. सुमारे ३०० फूट खोलावर असणाऱ्या कोळशाला 'खुल्या' व त्यानंतरच्या कोळश्याला 'भूमीगत' प्रकाराने बाहेर काढला जातो. भूमीगत खाणीतून उत्पादन म्हणजे खतरनाकच! त्यातही उपलब्ध साठ्यांपैकी फक्त २% कोळसा काढता येऊ शकतो. भूमीगत खाणीचा विस्तार 'बोर्ड आणि पिल्लर' या प्रकाराने होतो. यात १०फूट X १०फूट भुयार तयार करण्यात येऊन मध्ये-मध्ये सलग पिल्लर सोडावा लागतो. याला कारण म्हणजे, कोळशाच्या थरावर असणाऱ्या दगड-मातीचे वजन पेलविता येणे सुलभ व्हावे यासाठी. या खाणीत उत्खननाच्या स्थानापर्यंत पोहोचण्यासाठी सुमारे तीन ते चार कि.मी. पर्यंत पायपीट करावी लागते. ही पायपीट सोपी नाहीच. एखादा डोंगर चढावा वा उतरावा लागतो. या प्रकारची साधारणपणे एकास तीन, एकास पाच, एकास आठ या प्रमाणे ही चढण-उतरण असते. याला अपवाद आहे ती बल्लारपूरची खाण. तिला एकास अठरा अशी चढण आहे. अशी सुलभ वाटचाल असणारी ती आपल्या देशातील एकमेव खाण.

सुरुवातीला सोपी वाटणारी ही वाट हळूहळू बिकट होत जाते. मान सारखी खाली घालून, डोळ्यात तेल टाकून, उष्ण व दमट वातावरणात चालणे क्रमप्राप्त होते. ही पायवाट तशी फसवीच. डोके वर केले की कपाळमोक्ष ठरलेलाच. अगदी चिखलातून जावे लागते, त्यामुळे घसरुन पडणे ही नित्याचीच बाब. शिरटोपीला असलेल्या बॅटरीच्या अंधूक प्रकाशात कामे करावी लागतात. घामाच्या धारा निथळत असतानाच सभोवार दृष्टी फिरवून अदमास घ्यावा लागतो. आजूबाजूच्या भिंतींना हात लावून तापमान बघावे लागते. वरचं छप्पर आणि बाजूच्या भिंतींची मजबुती लाकडी काठीने ठोकून होणाऱ्या आवाजाने ठरवावी लागते. सराईत कामगारांना

यातील कमी-जास्त लगेच कळते. कित्येकदा वरच्या जमीनीच्या दाबाने पिल्लर खचण्याचा धोका असतो, त्यासाठी वरील क्रिया कराव्या लागतात. सुरक्षेच्या अनुषंगाने सर्वात महत्त्वाचे म्हणजे -'गॅस टेस्टींग'. इथे प्राथमिक स्वरूपाचे विज्ञान कामी येते. कोळसा म्हणजे कार्बन. हा कार्बन हवेतल्या प्राणवायुशी संयोग पावून कार्बन-मोनाक्साईड आणि कार्बन-डाय-ऑक्साईड या वायूत रूपांतरीत होतो. पैकी कार्बन-डाय-ऑक्साईड हा अग्निशमक आणि निरूपद्रवी वायू. मात्र, कार्बन-मोनाक्साईड अती जहाल. हवेतील याचे ०.१०% असणे म्हणजे माणसाचा तात्काळ मृत्यू. त्यापेक्षा कमी प्रमाण असले तर चक्कर येणे, डोके गरगरणे, मळमळ, ओकाऱ्या असली लक्षणे दिसू लागतात. इथे मानवाच्या मदतीला धावतो तो निसर्ग. लहान लहान चिमण्या (हिन्दीत-गुनिया) या वायूला जास्त संवेदनशील असतात. माणसांना काही लक्षणं आढळण्याच्या आधीच त्या माना टाकण्यास सुरुवात करतात. यावेळी 'धोका' ओळखून पुढचा प्रवास जागीच थांबवून सुरक्षेला प्राधान्य देण्यात येते. लगेच वरिष्ठांना कळवून पलीकडील भागाचा प्राणवायुचा पुरवठा रोखण्यासाठी एक वीट जाडीची भिंत तात्काळ बांधण्यात येते. यामुळे हवेचा प्रवाह रोखला जाऊन पुढील अनर्थ टाळण्यास मदत होते. कार्बन-मोनाक्साईड सुद्धा उर्वरित ऑक्सीजनशी संयोग पावून कार्बन-डाय-ऑक्साईडमध्ये मध्ये रूपांतरीत झाल्याने भिंतीपलीकडे ज्वलन आणि शमन हे दोन्ही प्रकार एकाचवेळी घडत असतात. मात्र सुरक्षेची ही प्रक्रिया इथेच थांबत नाही. खणनच्या भाषेत एक वीट रुंदीच्या भिंतीला 'वेन्टीलेशन स्टॉपींग' म्हणतात. या स्टॉपींगच्या अलीकडे सुमारे १०० मीटर अंतरावर 'आयसोलेशन स्टॉपींग' बांधण्यात येते. ही एक मीटर रुंदीची असून कोळशाच्या आत सुमारे एक मीटर चहुबाजूने खोदून नंतर रचण्यात येते. आत होणाऱ्या प्रक्रियेचा अदमास घेण्यासाठी १ इंच साईजचा नळ आतमध्ये सोडून त्यातून गॅस सॅम्पल विशिष्ट प्रकारच्या काचेच्या बॉटलमध्ये जमा करण्यात येऊन तो प्रयोगशाळेत विश्लेषणासाठी पाठविण्यात येतो. इथे कार्बन-मोनाक्साईड, कार्बन-डाय-ऑक्साईड, मिथेन, हायड्रोजन, ऑक्सीजन व नायट्रोजन इत्यादी वायूंचे विश्लेषण करण्यात येते. या आधारावर खाणीसाठी पुढील निर्णय घेण्यात येतात.

चंद्रपूर जिल्ह्यातील घुग्गुस येथील खाणीत १९७९ साली लागलेल्या आगीत विश्लेषक म्हणून मला आलेला अनुभव भविष्यात बराच कामी आला. येथील रॉबर्टसन इन्क्लाईने मध्ये लागलेल्या भीषण आगीला विझविण्याकरिता ही खाण मुखापासून झाकण्यात आली आणि आतमधल्या पोकळीला वर्धा नदीचे पाणी उपसा करून बुजविण्यात आले. आग विझल्यांनंतर, गॅस सॅम्पलचे विश्लेषण, कार्बन-डाय-ऑक्साईड ०.५% आणि नायट्रोजन ९९.५% असे जवळपास महिनाभर आल्यानंतर ही खाण हळूहळू उत्पदनासाठी सुरू करण्यात आली. इथल्या प्रयोगशाळेतील विज्ञान अगदी साधेसोपे असते.

$$2CO+O_2=2CO_2$$
$$C+O_2=CO_2$$
$$CH_4 +2O_2 = 2H_2O+CO_2$$
$$2H_2 + O_2 = 2H_2O$$

या मूलभूत क्रियांचा हॅल्डन ॲपरेटसवर प्रयोग करून येणाऱ्या आकडेवारीवरून निरनिराळया गॅसेसचे प्रमाण काढण्यात येते.

भूमीगत खाणींची आणखी एक विशेषता म्हणजे अशिक्षित कामगारांचा मोठ्या प्रमाणात भरणा. त्यांच्याकडून कामे करवून घेण्यासाठी सोप्या पद्धतीचा अवलंब केला जातो. उदा. २३०V ऐवजी अशा खाणीत ११०V संपूर्ण यंत्रणा कार्य करते. यामुळे शॉक लागत

नाही. ठरावीक अंदाजात दोन तारांना एकदा, दोनदा, तीनदा जोडून शार्ट केले की काय करायचे आहे याचा पुढच्यास इशारा मिळतो आणि पुढचे कार्य सुरळीत पार पडते.

असो. अशाप्रकारे सुरक्षेची काळजी घेत, कोळशाच्या थराच्या पायथ्याशी कोलकटींग मशिनने सुमारे एक मीटर आतपर्यंत दोन इंच उंचीची खाच पाडण्यात येते. यावेळी उडणारा धुरळा संपूर्ण मार्ग व्यापून टाकतो. तो खाली बसण्यास सुमारे अर्धा तास वेळ जाऊ द्यावा लागतो. त्यानंतर ड्रिल मशिनने उर्वरित भिंतीत भोके करून (सुमारे एक मीटरची) पाडण्यात येऊन बारूद व डिटोनेटरर्स भरल्या जातात. शेवटची जागा मातीच्या लांबसर कांड्यानी भरून व ठासून पक्की करण्यात येते. नंतर मशिनच्या साहाय्याने ही बारूद उडवली जाते. यावेळी आवाज व थरथरणाऱ्या भिंतींना बघून भूकंपाचा अनुभव येतो. परत धुरळा बसण्यास अर्धा तास जाऊ द्यावा लागतो. त्यानंतर मोठमोठ्या फावड्या-चमच्यांनी हा कोळसा डाल्यात भरून रोपवेच्या साहाय्याने खाणीबाहेर काढला जातो.

१९७५ साली खाणींचे राष्ट्रीयकरण झाले. अनेक सोयी सरकारने उपलब्ध करून दिल्यात. पक्की घरे आलीत, अद्ययावत हॉस्पिटल्स उभी झालीत, ट्रॉली ऐवजी कन्व्हेयर बेल्ट आलेत, साध्या परीक्षणाऐवजी कम्प्युटराईजड् टेस्टींग आले, वेतनात भरभक्कम वाढ झाली, पण तुमच्या-आमच्या ऐशआरामासाठी काम करणारा खाणीचा हा कामगार अजूनही उपेक्षित आहे. खाणीत आढळणाऱ्या धुलीकणांनी ग्रसीत होऊन त्याची फुप्फुसे निकामी होत आहेत. त्याचे आयुष्य पंधरा वर्षांनी कमी होत आहे. या रोगाला सिलिकोसीस (Silicosis) असे म्हणतात. यावर औषध नाही.

तेंव्हा धूळ, चिखल, विषारी वायू आणि इतर संकटांशी सामना करत या खाणीत काम करून सर्वसामान्यांसाठी आपली प्राणाहुती देणाऱ्या या खणन योद्धांना तुम्हा-आम्हा सर्वांचा सलाम!

**- दिलीप नारायण वंडलकर**
४, नरकेसरी सोसायटी,
उज्ज्वल नगर, नागपूर - ४४००२५
मो. नंबर - ९८३४६३६६५५
ई मेल-wandalkardilip@gmail.com

●●●

---

(पृष्ठ क्र. १९ वरून - **एस. टी. कोलरिज या इंग्रजी कवीला उद्देशून-**)

सगळ्यांना कळते. आमच्याकडे कविता कळायला डोकं लागतं नाही रे! फक्त भावना 'जागवणारे' सोपे शब्द लागतात. म्हणजे शेंटिमेंटल करायचं रे! अर्थाचं आम्हाला काही देणं-घेणं नाही! काहीही अर्थ नसलेली किंवा अर्थ कळत नसलेली कविताही आम्हाला चालते. फक्त सोपं लिहायचं, झालं!

कोलरिजभाऊ, तुला या जन्मात तर असं पुण्य जमवता आलं नाही. बघ पुढच्या जन्मी कवी झालास तर सोप्प लिहून पुण्य गाठीशी बांध बाबा! तेवढंच जगणं सोपं आणि साधं केल्याचं तुला समाधान आणि आम्हाला सुख!...

**- प्रा. डॉ. आनंद कुलकर्णी**
इंग्रजी विभाग प्रमुख
ग्रामोन्नती मंडळाचे कला व वाणिज्य
महाविद्यालय, नारायणगांव


●●●

## पुस्तक परीक्षण

# गणित अध्यापक आणि प्रसारक : स. पां. देशपांडे

*ग्रंथाली या ख्यातनाम पुस्तक प्रकाशन संस्थेने प्रकाशित केलेल्या 'गणित अध्यापक आणि प्रसारक : स. पां. देशपांडे' या पुस्तकाचे परीक्षण या लेखात केले आहे - संपादक*

ग्रंथाली या ख्यातनाम पुस्तक प्रकाशन संस्थेने जुलै २०२१ मध्ये प्रकाशित केलेले एक पुस्तक माझ्या नुकतेच हातात आले. त्या पुस्तकाचे नाव, 'गणित अध्यापक आणि प्रसारक : स. पां. देशपांडे' असे आहे. विज्ञान आणि गणित प्रसाराचे काम करीत असताना माझी श्री. स. पां. देशपांडे सरांशी बऱ्याचदा भेट झाली. एक हसऱ्या चेहऱ्याचे, शांत स्वभावाचे आणि मितभाषी गणिततज्ज्ञ अशी माझ्या मनात त्यांची प्रतिमा निर्माण झाली. बोलायला उभे राहिले की त्यांच्यातील विनोदबुद्धी देखील मधून मधून डोकावत असे. गणितातील क्लिष्ट संकल्पना सोप्या पद्धतीने समजावून देण्यात त्यांचा हातखंडा होता. वक्तृत्वाबरोबरच ईश्वराने त्यांना लेखन-कौशल्य देखील बहाल केले होते. आपल्या कारकीर्दीत त्यांनी विपुल लेखन केले होते. गणित हा त्यांच्या अध्ययन व अध्यापनाचा प्रमुख विषय होता. त्यामुळे त्यांचे बरेचसे लेख गणिताचा विकास, गणिताचे अध्यापन, काही प्रसिद्ध गणिती या विषयावर असत. याखेरीज इतर अवांतर विषयांवर देखील त्यांनी लेखन केले होते. १० सप्टेंबर २०१२ रोजी त्यांनी इहलोकीची यात्रा संपविली. त्यांच्या मृत्यूनंतर त्यांचे कनिष्ठ बंधू श्री. अ. पां. देशपांडे यांनी त्यांचे सगळे लेख एकत्र केले तेव्हा त्यांची संख्या २१८ एवढी मोठी असल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यातील निवडक १०० लेखांचा समावेश करून त्यानी हे पुस्तक सम्पादित केले आहे.




पुस्तकाची सुरुवात संपादकांच्या मनोगताने होते. या सदरात श्री. अ. पां. देशपांडे यांनी मोजक्या शब्दात त्यांच्या ज्येष्ठ बंधू बद्दल आपली मते मांडली आहेत. श्री. अ. पां. देशपांडे हे मागील पाच दशके कार्यवाह या नात्याने मराठी विज्ञान परिषदेची धुरा वाहात आहेत. विज्ञान प्रसाराचा त्यांना दीर्घकाळ अनुभव आहे. त्याचबरोबर आपले विचार मोजक्या शब्दांत मांडायची कला त्यांना अवगत आहे. त्यामुळे आपले मनोगत लांबलचक होणार नाही याची त्यांनी काळजी घेतली आहे. या पुस्तकाला डॉ. विवेक पाटकर यांची प्रस्तावना लाभली आहे. डॉ. पाटकर यांनी मागील चार दशकांत गणित प्रसारक म्हणून नाव कमावले आहे. त्यांनी, 'वसा - गणित प्रसार आणि प्रबोधनाचा' असा मथळा देऊन आपले विचार मांडले आहेत. ते मुळातूनच वाचण्यासारखे आहेत.

आपल्या साऱ्या दु:खांचे मूळ देहाभिमान आहे!

वाचकांच्या सोयीसाठी संपादकांनी १०० लेखांचे ७ विभाग केले आहेत. ते खालीलप्रमाणे आहेत.

१. गणितावरील लेख
२. गणित विषयक इतर लेख
३. गणितींवर लेख
४. गणित विषयक पुस्तकांची परीक्षणे
५. इतर विषय
६. इतर व्यक्ती
७. इतर विषयांच्या पुस्तकावरील परीक्षणे.

पुस्तकाच्या पहिल्या भागात गणित या विषयावरील १३ लेख आहेत. त्यांची सुरुवात हार्डी रामानुजन यांच्या पत्र व्यवहाराने होते. याखेरीज अनेक विषयांवरचे लेख या सदरात समाविष्ट केलेले आहेत. यात भारतीय प्राचीन गणिताची ओळख करून देणारे लेख आहेत. जसे आमच्या पूर्वजांच्या शून्य विषयक कल्पना, आर्यभटांची घनमूळ काढण्याची रीत, वैदिक गणित इत्यादी. त्याचबरोबर गणित ऑलिंपियाड, नवगणितच का, २००७ स्वयंभू संख्या वर्ष अशा प्रासंगिक विषयांवरचे लेख देखील आहेत.

पुस्तकाच्या दुसऱ्या भागात ११ लेख एकत्र केलेले आहेत. यात समाविष्ट केलेल्या काही लेखांचे मथळे असे आहेत : मूलगामी संशोधनात भारत मागेच, गणिताची परवड थांबणार कशी? आडातच नाही तर पोहोऱ्यात येणार कुठून? या लेखांमधून लेखकाने गणित अध्यापनाच्या दयनीय अवस्थेवर प्रकाश टाकला. एवढ्यावरच ते थांबले नाहीत तर त्यावर काय उपाय करावेत याचे मार्गदर्शन देखील त्यांनी केले आहे.

ग्रंथाचा तिसरा विभाग बराच मोठा असून त्यामध्ये एकूण २८ लेख आहेत. वर सांगितल्याप्रमाणे या विभागात गणितींवर लेख आहेत. यामध्ये गणिताच्या विविध शाखांमध्ये काम करणाऱ्या गणिततज्ज्ञांची माहिती देणारे लेख आहेत. जसे सांख्यिकी शास्त्रज्ञ वसंत शंकर हुजूरबाजार, आहार संख्यातज्ज्ञ पांडुरंग वासुदेव सुखात्मे, गणित व्यासंगी नारायण हरी फडके, प्राचीन गणित परंपरेचे वारसदार केरो लक्ष्मण छत्रे, आकड्यांशी लिलया खेळणारे दत्तात्रेय रामचंद्र कापरेकर, आकडेमोडीचा आशीक देवदत्त डी. बी. लाहिरी, अलौकिक प्रतिभेचे मानकरी सी. आर. राव इत्यादी. गणिताच्या विकासात महिलांचे योगदान स्पष्ट करण्यासाठी स.पां. देशपांडे यांनी, 'महिला गणिती' या विषयावर वर्तमानपत्रात एक लेख लिहिला होता. त्याचाही समावेश या विभागात केलेला आहे.

श्री. स. पां. देशपांडे गणिताचे अध्यापन करीत असत. त्यामुळे त्यांच्याकडे गणित विषयक पुस्तकांचे परीक्षण करण्याचे काम ओघानेच येत असे. ही जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली आणि अनेक पुस्तकांचे परीक्षण लिहून ते प्रकाशित केले. या विभागात एकूण १२ पुस्तक परीक्षणांचा समावेश केला आहे. यात गॅनबाचे कॅल्क्युलस, लिलावती पुनर्दर्शन, अपूर्णांकाचा गोंधळ दूर करणारे पुस्तक, याबरोबरच युक्लीडचे एलिमेंट्स, गणिताच्या इतिहासाची कथा अशा पुस्तकांची परीक्षणे देखील आहेत. गणितासोबतच इतर विषयांच्या पुस्तकांची परीक्षणे देखील देशपांडे सरांनी केलेली आहेत. या प्रकारातील ३ परीक्षणे ७ व्या विभागात घेतली आहेत.

'गणित अध्यापन आणि प्रसार' हे देशपांडे सरांच्या कार्याचे प्रमुख क्षेत्र होते. या विषयावर त्यांनी विपुल लेखन केले आहे. त्याचबरोबर त्यांनी इतर अनेक क्षेत्रांत मुशाफिरी केली आहे. निसर्ग, समाज, मानवी संबंध अशा अनेक विषयांवर त्यांनी लेखन केले. त्यातील १३ लेख निवडून संपादकाने त्याचा एक विभाग केला आहे. पुस्तकाच्या पाचव्या भागात चित्रपट प्रदर्शन, आयुर्वेद, अध्यात्म, शिक्षण प्रणाली, विज्ञान विकास अशा विविध विषयांवर लिहिलेले लेख आपल्याला वाचायला

मिळतात. असाच प्रकार आपल्याला सहाव्या विभागात पाहायला मिळतो. या विभागात गणिताखेरीज इतर क्षेत्रांत काम करणाऱ्या व्यक्तींबद्दल माहिती आढळते. यात संगीत क्षेत्रात आपले अढळ स्थान निर्माण करणारे वामनराव देशपांडे भेटतात; तसेच मराठी भाषेतून शिक्षण प्रसार करणारे कॅप्टन जर्विस देखील भेटतात.

श्री. स. पां. देशपांडे यांच्या विपुल लेखनातून १०० निवडक लेख घेणे हे एक कठीण काम होते. ही जबाबदारी पुस्तकाचे संपादक श्री. अ. पां. देशपांडे यांनी लिलया पेलली आहे. या निवडक लेखांतून त्यांनी आपल्या ज्येष्ठ बंधूच्या विचारांची प्रगल्भता आपल्यापुढे ठेवली आहे. परिशिष्ट १ मध्ये त्यांनी आपल्या ज्येष्ठ बंधूचा जीवन वृत्तांत थोडक्यात दिला आहे. यातून आपल्याला श्री. स. पां. देशपांडे यांच्या व्यक्तिमत्त्वाची कल्पना येते. तसेच, परिशिष्ट २ मध्ये त्यांच्या लेखनाचा आवाका किती मोठा होता याची माहिती दिली आहे. अनेक वर्तमानपत्रांत आणि मासिकांत त्यांनी लेखन केले. याखेरीज त्यांनी लिहिलेल्या पुस्तकांची यादी देखील बरीच मोठी असल्याचे आपल्याला या परिशिष्टावरून लक्षात येते. या पुस्तकाची पहिली आवृत्ती १ जुलै २०२१ रोजी प्रकाशित करण्यात आली आहे.वर सांगितल्याप्रमाणे ग्रंथाली या प्रथितयश संस्थेने ते आपल्याला उपलब्ध करून दिले आहे. पुस्तकाचे मूल्य चारशे रुपये ठेवण्यात आले आहे. प्रत्येक गणित प्रेमी व्यक्तीने आपल्या संग्रही ठेवावे असेच हे पुस्तक आहे.

**– डॉ. सुधाकर आगरकर**
प्राध्यापक आणि अधिष्ठाता
विप्रमंचे आंतरराष्ट्रीय शिक्षण आणि संशोधन केंद्र
नौपाडा, ठाणे ४००६०२

•••

**ग्रंथ परिचय**

## गुरुदेव रानडे व्यक्तिमत्त्व आणि तत्त्वज्ञान

या ग्रंथाची ही दुसरी आवृत्ती ई-बुक स्वरूपात प्रकाशित होत आहे. ग्रंथाचा थोडक्यात परिचय येथे दिला आहे. गुरुदेव रानडे तत्त्वज्ञानी संत व अलाहाबाद विद्यापीठाचे माजी कुलगुरु, अनेक जगतविख्यात ग्रंथांचे लेखक होते. गुरुदेव रानडे यांचे अलाहाबादचे स्नेही प्रा. शुक्ल यांना तेथील काही मंडळींनी विचारले– 'प्रा. रानडे यांनी आत्मचरित्र लिहिले नाही का?' त्यावर 'हिंदी संतांचा ईश्वरप्राप्तीचा मार्ग' हा गुरुदेवांचा ग्रंथ त्या मंडळींच्या पुढे ठेवून प्रा. शुक्ल म्हणाले, 'हे त्यांचे आत्मचरित्र, त्यांच्या प्रत्येक ग्रंथात त्यांचे आत्मचरित्र आहे'. हा प्रसंग, 'गुरुदेवांच्या आठवणी' या पद्मश्री काका कारख़ानीस यांच्या पुस्तकाच्या प्रस्तावनेत दिला आहे. यावरून हे स्पष्ट होते की, गुरुदेवांचे जीवन आणि तत्त्वज्ञान याबद्दल जाणून घ्यायचे तर त्यांच्या ग्रंथांचाच अभ्यास करायला हवा. मागच्या पिढीला गुरुदेव रानडे चांगले माहीत आहेत, परंतु आजच्या पिढीपुढे त्यांचे कार्य आजच्या पद्धतीने मांडले तर ते त्यात रुची घेतील. तसा हा प्रयत्न आहे. आणखी एक मुद्दा म्हणजे गुरुदेवांनी अलाहाबाद विद्यापीठात तत्त्वज्ञानशाखा वाढवली, आजही तेथे हजारोंच्या संख्येने विद्यार्थी वळत आहेत व ते स्पर्धा परीक्षांत नेत्रदीपक यश मिळवीत आहेत. त्याचा प्रसार आपल्याकडेही झाला पाहिजे. गुरुदेवांच्या तत्त्वज्ञानावरील हे संकलन प्रकाशित करण्याने त्यांचे कार्य लोकांपुढे जाईल म्हणून हे प्रकाशन सादर होत आहे. पहिल्या आवृत्तीत काही सुधारणा करून, पुनरुक्ती कमी करून व थोडी नवी भर घालून ग्रंथाची उपुक्तता वाढविण्याचा प्रयत्न या आवृत्तीत केला आहे.

**– डॉ. हेमचंद्र दयार्णव कोपर्डेकर**
बी २।२० सरिता वैभव, सिंहगड रस्ता, पुणे
Email : hdkopardekargmail.com

# परिसर वार्ता

**- संकलित**

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग

नमस्कार, सर्वांना ८६ व्या वर्धापन दिनाच्या मी सौ. सीमा केळकर, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, पूर्व प्राथमिक विभाग प्रमुख आपणा सर्वांना शुभेच्छा देते.

मी सन २०१७ पासून पूर्व प्राथमिक विभागाची विभागप्रमुख आहे. त्यावेळी पटसंख्या खूप चांगली होती. आम्ही सर्वजण सण-उत्सव आनंदाने साजरे करत होतो. पण सन २०२०-मार्च पासूनच्या कोरोना महामारीमुळे इतर व्यवहारांबरोबर कोविड-१९ शिक्षण व्यवस्था ठप्प झाली. विद्यार्थ्यांच्या प्रत्यक्ष शाळेतील अध्यापनाच्या वाटा बंद झाल्या. लॉकडाऊन जाहीर झाले व मुलांचा वार्षिक निकाल आधीच्या मूल्यमापनावरून लावला गेला.

जून महिना सुरू झाला तरी संपेना, तेव्हा मात्र सर्व शिक्षकांपुढे प्रत्यक्ष लॉकडाऊन. शाळेत मुलांना न बोलावता त्यांचे शिक्षण सुरू ठेवण्याचे आवाहन निर्माण झाले. तेव्हा ऑनलाईन शिक्षण पद्धतीने शिक्षण द्यायचे ठरले. मुलांच्या वयाचा त्यांच्या मानसिकतेचा विचार करून प्रथम शिक्षकांनी व्हिडिओ मेकींगचे मार्गदर्शन घेऊन What's App वर वर्गांचे ग्रुप तयार करून ऑडिओ-व्हिडीओ द्वारे Zoom Google मिटींगद्वारे मुलांच्या अडचणी दूर करत अध्ययन चालू केले.

वर्षभरातील सण-उत्सव वर्गात साजरे करून त्यांचे व्हिडिओ मुलांना ग्रुपवर टाकले. उदा. आषाढी एकादशीला शिक्षकांनी दिंडी करून त्याचा व्हिडिओ पाठवला. १५ ऑगस्टला झेंडा कसा रंगवायचा ते शाळेत शिक्षकांनी व्हिडिओ करून दाखवले. गणेशोत्सवात शाडूची गणेशमूर्ती आणून त्याचा व्हिडिओ पाठवला. अशाप्रकारे रंग ओळख, चवींचा उपक्रम ऑनलाईन वर मार्गदर्शन करून शिकवले. याशिवाय अध्ययन सुद्धा चालू ठेवले.

दरवर्षी होणाऱ्या स्पर्धांचे मार्गदर्शन करून मुलांना ऑनलाईन स्पर्धेत भाग घेण्यास प्रोत्साहन दिले. अशाप्रकारे पालकांच्या सहाय्याने सर्व अडचणींवर मात करत मुलांचे अध्ययन शिक्षकांनी ऑनलाईन पद्धतीने चालू ठेवले. यात मंडळाने देखील शिक्षकांच्या अडचणी समजून घेऊन आम्हाला सहकार्य केले. यासाठी मी मंडळाचे आभार मानते.

कोविड-१९ चा प्रभाव लवकरात लवकर संपून पूर्वीसारखे शिक्षण चालू होऊन मुलांच्या किलबिलाटाने शालेय परिसर गजबजून जाऊ दे.

सर्वांना आरोग्यदायी व सुखकारक जीवन लाभावे हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

## डॉ. बेडेकर विद्या मंदिर, माध्यमिक विभाग

- **शालांत परीक्षा २०२१**

या वर्षी आपल्या शालांत परीक्षेचा निकाल १००% लागला असून हर्षाली भुरे व सिद्धी खोडदे या विद्यार्थिनी ९७.२०% गुण मिळवून शाळेत सर्वप्रथम आल्या.

- ठाणे जिल्हा भारत स्काऊट गाईड राज्य पुरस्कार परीक्षेत आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी यश संपादन केले आहे.

कोरोना नियमांचे पालन करून ही स्पर्धा पार पडली. जिल्ह्यातील विविध शाळांतील पंधरा विद्यार्थ्यांनी या परीक्षेत सहभाग नोंदवला होता. यामध्ये

आपल्या शाळेतील संजना बोरवणकर आणि प्रचीती जामगावकर यांनी गाईडमध्ये, तर वेदांत जाधव याने स्काऊटमध्ये यश संपादन केले आहे.

• **गुरुपौर्णिमा**

दि. २३ जुलै २०२१ रोजी इ. १० वी अ, इ. ९ वी क, ड, इ, इ. ७वी अ, ब, क, ड, इ तसेच इ. ५ वी अ, ब, क च्या विद्यार्थ्यांसाठी गुरुपौर्णिमेचा ऑनलाईन कार्यक्रम साजरा करण्यात आला.

यात विद्यार्थ्यांनी गुरुपौर्णिमेचे महत्त्व मराठी, हिंदी, इंग्रजी व संस्कृत मधून सांगितले. तसेच कविता आणि गाणी सादर केली.

कार्यक्रमात मा. मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापिका व पर्यवेक्षिका उपस्थित होते. सर्व पदाधिकाऱ्यांनी इ. १० वीच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

• **जागतिक योगदिन**

दि. २१ जून २०२१ या दिवशी इ. ५ वी ते १० वी सर्व विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन योगदिन कार्यक्रम साजरा करण्यात आला. त्या निमित्ताने विद्यार्थ्यांना योगाचे महत्त्व सांगून काही योगासने करवून घेतली. ऑनलाईन योगाचा व्हिडिओ शेअर करून विद्यार्थ्यांना विविध योगासनांचे प्रात्यक्षिक दाखवले.

**शालांत परीक्षा निकाल २०२१**

शाळेचा एकूण निकाल : १००%

एकूण विद्यार्थी. : २२५

एकूण उत्तीर्ण : २२५

विशेष प्रावीण्य : १२४

प्रथम श्रेणी : ६४

द्वितीय श्रेणी : ३७

एकूण विद्यार्थी : २२५

**प्रथम दहा विद्यार्थी खालीलप्रमाणे**

| | | |
|---|---|---|
| १) | भुरे हर्षाली संजय | ९७.२ |
| १) | खोडदे सिद्धी गोरक्ष | ९७.२ |
| २) | साटम समिधा विवेक | ९७ |
| ३) | तुपकर भूमी शंकर | ९६.८ |
| ४) | कमटलवार श्रुष्टी संजय | ९५.६ |
| ४) | आजिवले मनस्वी मनोज | ९५.६ |
| ५) | उतेकर सायली संदीप | ९५.२ |
| ६) | परांजपे हेमश्री हर्षल | ९५ |
| ७) | फुटक साक्षी राजेंद्र | ९४.८ |
| ८) | चिले श्वेता रोहिदास | ९४.४ |
| ९) | पिंगळे साई गिरीधर | ९४ |
| १०) | कुलकर्णी केतकी संजय | ९३.६ |

**विषयातील प्रथम विद्यार्थी**

| **विषय** | **विद्यार्थी** | **गुण** |
|---|---|---|
| **मराठी** | भुरे हर्षाली संजय | ९८ |
| **हिंदी** | वाघमारे भाग्यश्री बालाजी | ९० |
| **संस्कृत** | साटम समिधा विवेक | ९७ |
| | चिले श्वेता रोहिदास | ९७ |
| **इंग्रजी** | तुपकर भूमी शंकर | ९५ |
| **गणित** | भुरे हर्षाली संजय | ९८ |

केवळ पैसा हीच जगातील शक्ती नव्हे; चांगुलपणा, पावित्र्य आणि सेवाभाव ही खरी शक्ती – स्वामी विवेकानंद

| | | |
|---|---|---|
| | मालुसरे साहील सर्जेराव | ९८ |
| | कमटलवार सृष्टी संजय | ९८ |
| | पिंगळे साई गिरीधर. | ९८ |
| | साटम समिधा विवेक | ९८ |
| | टिपाले मीरा निलेश | ९८ |
| **विज्ञान** | साटम समिधा विवेक. | ९७ |
| | खोडदे सिद्धी गोरक्ष. | ९७ |
| **समाजशास्त्र** | तुपकर भूमी शंकर. | ९८ |

## सौ. आनंदीबाई जोशी इंग्रजी प्राथमिक विभाग

### सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत ऑनलाईन योग दिनाचे आयोजन

### आंतरराष्ट्रीय योग दिन (२१ जून २०२१)

आंतरराष्ट्रीय योग दिन दरवर्षी २१ जून रोजी साजरा केला जातो. दरवर्षी प्रमाणे योग दिन वेगवेगळ्या थीमच्या आधारे साजरा केला जातो. या वर्षी २०२१ च्या योग दिनाची थीम 'बी विथ योगा, बी अॅट होम', म्हणजेच 'योगासह रहा, घरी रहा' अशी आहे. आणि आमची शाळा सौ. ए. के. जोशी इंग्लीश मिडियम स्कूलच्या प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनीही (इयत्ता १ली ते ४थी) आपल्या शारीरिक व मानसिक अनारोग्याचे निवारण व्हावे यासाठी ऑनलाईन योग दिन अतिशय उत्साहाने साजरा केला. त्यात विद्यार्थ्यांना नियमित योग करण्याचा सल्ला व काही विशिष्ट आसने शिकवून विद्यार्थ्यांना निरोगी राहण्याचे महत्त्व शिक्षकांनी सांगितले.

### सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत ऑनलाईन चित्रकला स्पर्धेचे आयोजन २०२० - २०२१

दरवर्षीप्रमाणे मॅडम रोशन जाल पटेल यांच्या स्मृती प्रीत्यर्थ इ. १ली ते ४थीच्या विद्यार्थ्यांची चित्रकला स्पर्धा ऑनलाईन घेण्यात आली. त्यात विद्यार्थ्यांना वेगवेगळे विषय देऊन योग्य प्रकारे मार्गदर्शन केले गेले. दिनांक २६ जून रोजी शाळेच्या वेळेत विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयांवर अतिशय उत्तम असे चित्र काढून ही स्पर्धा अनुभवली. त्याचे विषय - My House, My Ship, Fish Tank, Fruit Basket, Peacock, Garden, Mode of Transport and Fruit, House, etc. असे होते.

### स्पेल बी आंतरराष्ट्रीय परीक्षा २०२० - २०२१

सौ. ए. के. जोशी प्राथमिक विभागाच्या खालील विद्यार्थ्यांनी स्पेल बी आंतरराष्ट्रीय परीक्षेत प्रथम श्रेणीचे यश मिळवले.

१) कु. आराध्या मंगेश भोसले - इ. ३री.

२) कु. रेवा सावंत - इ. ४थी.

शाळेतून त्यांचे अभिनंदन व कौतुक करण्यात आले.


### सौ. आनंदीबाई केशव जोशी शाळेत ऑनलाईन आषाढी एकादशीचे आयोजन (२० जुलै २०२१)

सौ. ए. के. जोशी इंग्लिश मिडीयम मधे रंगला आषाढी एकादशीचा सोहळा. दिनांक २० जुलै २०२१ रोजी यंदाही प्राथमिक विभागाने साजरी केली ऑनलाईन आषाढी एकादशी. या कार्यक्रमात ज्ञानोबा माउली, तुकारामाच्या अखंड जयघोषाने आणि विठू नामाच्या गजराने... टाळ-मृदंग वाजवत हरी नामाच्या गजरात तल्लीन होऊन आमच्या शाळेच्या इ. १ ली ते ४ थीच्या बाळगोपाळांनी छोटे वारकरी बनून विविध गोष्टी सादर केल्या. त्यात प्रामुख्याने विठ्ठलनामचा गजर, तुझे रूप चित्ती राहो... (गाणे), कथा, विठ्ठलाच्या वारीचे महत्त्व व माहिती आणि शेवट विठूमाउलीच्या आरतीने करण्यात आला. शाळेने विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## जोशी–बेडेकर महाविद्यालय

### दिवंगत अभिनेते दिलीप कुमार यांच्या स्मृतींना उजाळा

दिनांक २२ जुलै २०२१ रोजी जोशी बेडेकर स्वायत्त महाविद्यालयाच्या फिल्म सोसायटी आणि जनसंज्ञापन विभागाच्यावतीने दिवंगत चित्रपट अभिनेते दिलीप कुमार यांच्या स्मृतींना उजाळा देण्यासाठी विशेष व्याख्यान व चित्रपट प्रदर्शित करण्यात आला. ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक महेंद्र तेरेदेसाई यांनी दिलीप कुमार यांच्या कारकिर्दीवर आपल्या व्याख्यानातून प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक फिल्म सोसायटीचे समन्वयक डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांनी केले. या प्रसंगी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी दिलीप कुमार यांच्या नैसर्गिक अभिनया बद्दल व एकूणच त्यांच्या कारकिर्दीबद्दल आपले मत व्यक्त केले.



महेंद्र तेरेदेसाई यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दिलीप कुमार व तत्कालीन चित्रपट सृष्टी मधील सामाजिक व सांस्कृतिक घडामोडींचा आढावा घेतला. राजकुमार, दिलीप कुमार व देवानंद हे तीन कलावंत एकाच वेळेला अभिनयाच्या क्षेत्रात आपले कसब दाखवत होते; मात्र दिलीप कुमार यांचा अभिनय 'मेथड ॲक्टींग' नावाने प्रसिद्ध झाला. ते केवळ ट्रॅजेडी किंग म्हणून सर्वपरिचित असले, तरीही वेगवेगळ्या भूमिका त्यांनी साकारल्या आहेत असे श्री. तेरेदेसाई म्हणाले. खरा कलावंत हा 'अथलेट फिलॉसॉफर' असतो; अर्थात त्यामध्ये खेळाडू सारखा लवचिकपणा आणि आयुष्याचं भान देणारी तत्त्वप्रणाली असते. दिलीप कुमार यांच्याकडे या दोन्ही गोष्टी होत्या. कॅमेरामध्ये नेमकं काय टिपले जाणार आहे याची दिलीप कुमार यांना जाण होती असं ते म्हणाले.

या विशेष व्याख्याना नंतर दिलीप कुमार यांनी अभिनय केलेला 'मधुमती' हा चित्रपट आभासी पद्धतीने दाखविण्यात आला. जन संज्ञापन विभागाचे समन्वयक व उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. चिराग काजळे या विद्यार्थ्याने वक्त्यांचा परिचय करून दिला, तर श्रेया मेलमानी यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा. सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, ग्रंथपाल नारायण बारसे आणि अनेक प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे तिसावे पुष्प

विद्या प्रसारक मंडळाचे के. ग. जोशी कला व ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय (स्वायत्त) ठाणे, आयोजित डॉ. वा. ना. बेडेकर स्मृती व्याख्यानमालेचे तिसावे पुष्प दिनांक २९ जुलै २०२१ रोजी ज्येष्ठ ख्यातनाम पक्षी निरीक्षक, पर्यावरण तज्ज्ञ, लेखक किरण पुरंदरे यांनी 'जावे पक्ष्यांच्या गावा' या विषयावर ऑनलाईन स्वरूपात गुंफले.



डॉ. वा. ना. बेडेकर व्याख्यानमालेची समृद्ध परंपरा आणि त्यातून होणारे विचारमंथन याचा विद्यार्थ्यांना व शिक्षकांना खूप लाभ होतो असे मत यावेळी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी व्यक्त केले. जिथे आजकाल माणसाला माणसाची भाषा समजत नाही तिथे पक्ष्यांची भाषा समजून घेणारे जाणकार तज्ज्ञ व्याख्यानाला लाभले याबद्दल प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी आनंद व्यक्त केला.

किरण पुरंदरे यांनी विविध पक्षी, त्यांचे प्रकार याबद्दल माहिती दिली. पक्षी निरीक्षणाचे सूत्र सांगत त्यांनी व्याख्यानाची सुरुवात केली. जंगल सफर आणि पक्षी निरीक्षण मनुष्याला समृद्ध बनवतात असे मत किरण पुरंदरे यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना किरण पुरंदरे म्हणाले की, आयुष्यात जे कराल ते जिद्दीने करा. किरण पुरंदरे यांनी पावशा, घुबड, गरुड, ऑस्ट्रिच, किवी, रानकोंबडा अशा विविध पक्ष्यांच्या प्रजातींविषयी माहिती देऊन त्यांचे हुबेहूब आवाज काढले.

किरण पुरंदरे यांनी पक्ष्यांचे संस्कृत, मराठी, हिंदी, उर्दू अशा विविध भाषांमधील नामावली बद्दल सांगत त्यातील संशोधनाच्या संधींबाबत माहिती दिली. नागझिरा जंगलातील त्यांच्या ४०० दिवसांच्या वास्तव्याबद्दल सांगितले.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रश्नोतरे झाली. या कार्यक्रमास महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य सुभाष शिंदे, डॉ. प्रियंवदा टोकेकर, प्रा. संगीता दीक्षित, ग्रंथपाल प्रा. नारायण बारसे, सर्व प्राध्यापक गुगल मीट ॲपद्वारे सहभागी झाले होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापिका डॉ. विमुक्ता राजे यांनी केले. कार्यक्रमाचे संयोजन उपप्राचार्य डॉ. महेश पाटील यांनी केले, तर तांत्रिक बाजू प्रा. प्राची नितनवरे यांनी सांभाळली. व्याख्यानाची सांगता पसायदानाने झाली.

**प्राच्यविद्या अभ्यास संस्थेला अमेरिकन संशोधकाकडून ११०० ग्रंथांची भेट**



प्रसिद्ध अमेरिकन मानसोपचारतज्ज्ञ, कवी, संगीतकार फ्रँकलिन आबोट हे विद्या प्रसारक मंडळ संचलित जोशी-बेडेकर महाविद्यालयात २०१९ साली आयोजित भारतीय तत्त्वज्ञानावरील आंतरराष्ट्रीय परिसंवादात सहभागी झाले होते. त्यांच्या या भेटीत त्यांनी विद्या प्रसारक मंडळाच्या संकुलातील शैक्षणिक संस्थेचे कार्य जाणून घेतले. जोशी बेडेकर महाविद्यालयात सुरू असलेल्या विविध उपक्रमांची माहिती त्यांना मिळाल्याने ते अतिशय प्रभावित झाले होते. याच परिसंवाददरम्यान त्यांनी या महाविद्यालयाच्या ग्रंथालयाला देखील भेट दिली होती. अमेरिकेत परत गेल्यानंतर त्यांनी या महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सौ. सुचित्रा नाईक, ग्रंथपाल नारायण बारसे आणि प्रा. डॉ. प्रशांत धर्माधिकारी यांच्या संपर्कात राहून आपल्याकडील संशोधनासाठी उपयोगी ग्रंथसंपदा विद्या प्रसारक मंडळाला देणगीदाखल देण्याची इच्छा व्यक्त केली. कोविड समस्येमुळे यासाठी थोडा उशीर होत होता, पण संबंधितांशी अनेकदा इ-मेल द्वारे संपर्कात राहून त्यांनी स्वखर्चाने आपल्या संग्रहातील ११०० उपयुक्त ग्रंथ ठाणे येथे अलीकडेच पोहोचते केले. मानसशास्त्र, धर्म, तत्त्वज्ञान, कलाइतिहास, प्राच्यविद्या, पर्यटन फोटोग्राफी, संगीत, साहित्य, इतिहास, भूगोल इत्यादी विषयांच्या ग्रंथांचा यात सहभाग आहे.


स्पिरीट ऑफ ऐशिया, द कम्पलीट बुक ऑफ स्क्रिप्टराइटिंग, क्राफ्ट ऑफ काश्मीर जम्मू ऐण्ड लदाख, फोक साँग्स ऑफ द वर्ल्ड, महाराजा रंजीत सिंग अँज पेट्रोन ऑफ द आर्ट्स, मैजिक बॉल्स, पोयेट्स इन देयर यूथ, द गार्डन ऑफ लाईफ, अँन ईन्ट्रोडक्शन टू द हिलींग प्लान्ट्स, अ डिस्टेंट मिरर, वास्तू, द एनसाक्लोपिडिया ऑफ साईन्स अँड सिम्बॉल्स, मोशनलेस जर्नी फ्रॉम अ हेर्मिटेज ईन द हिमालयास, अ हिस्ट्री ऑफ फार ईस्टर्न आर्ट, आर्ट ऑफ ऐशिया, पैराडाईज ऑन द अर्थ इत्यादी अतिशय महत्त्वपूर्ण ग्रंथांचा यात समावेश आहे.

फ्रँकलिन आबोट यांनी पाठवलेली ग्रंथसंपदा ठाण्यात आल्यानंतर विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आणि प्राच्यविद्या अभ्यास संस्थेचे संचालक डॉ. विजय बेडेकर यांनी या सर्व संग्रहांचे अभ्यासपूर्ण अवलोकन केले. या ग्रंथसंपदेची विषयव्याप्ती आणि संशोधनमूल्य लक्षात घेऊन ही ग्रंथसंपदा विद्यार्थी, इतिहास संशोधक, प्राच्यविद्या संशोधक, तसेच विविध विषयात एम. फील आणि विद्यावाचस्पती अभ्यासासाठी अतिशय महत्त्वपूर्ण असल्याचे डॉ. बेडेकर यांच्या लक्षात आले. आणि म्हणूनच संपूर्ण ठाणेकर वाचक संशोधकांना ही ग्रंथसंपदा खुली करून देण्याच्या उद्देशाने डॉ. बेडेकर यांनी प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या ग्रंथालयात एक विशेष संग्रह दालन करण्याचे ठरवले आणि त्या संदर्भात आपल्या मार्गदर्शनाखाली काम सुरू केले.

ठाण्याच्या प्राच्य विद्या अभ्यास संस्थेत ही ग्रंथसंपदा सर्व अभ्यासकांसाठी लवकरच उपलब्ध करून देण्यात येईल असे विद्या प्रसारक मंडळाचे कार्याध्यक्ष डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले आहे. त्याचबरोबर लवकरच प्राच्यविद्या अभ्यास संस्थेच्या वतीने या ग्रंथांचे प्रदर्शन भरवण्यात येईल असेही डॉ. विजय बेडेकर यांनी सांगितले.

**महाविद्यालयाच्या सर्ज या माजी विद्यार्थी संघटनेने झूम या आभासी माध्यमातून साजरी केली गुरुपौर्णिमा**

विद्या प्रसारक मंडळाच्या के. ग. जोशी कला आणि ना. गो. बेडेकर वाणिज्य महाविद्यालयाच्या सर्ज या माजी विद्यार्थी संघटनेने गुरुपौर्णिमेच्या निमित्ताने प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांचा आशीर्वाद घेऊन शुक्रवार दिनांक २३ जुलै २०२१ रोजी सकाळी ११.३० वाजता झूम या आभासी माध्यमातून साजरी केली.



प्राध्यापक दीपक मुर्डेश्वर - विना अनुदानित विभागाचे माजी समन्वयक यांनी या कार्यक्रमाचे मुख्य अतिथी म्हणून स्थान भूषविले. कार्यक्रमाची सुरवात राष्ट्रगीताने झाली. त्यानंतर दीप प्रज्वलन चित्रफित ह्या माध्यमातून करण्यात आले. त्यानंतर सर्जचे सदस्य आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी वीरेंद्र देवस्थळी यांनी प्रमुख अतिथी, महाविद्यालयाच्या प्राचार्या आणि सर्व उपस्थितांचे स्वागत केले.

त्यानंतर वरिष्ठ महाविद्यालयाच्या उप-प्राचार्या डॉ. प्रियावंदा टोकेकर यांनी सर्ज या संस्थेची माहिती आणि त्याच्या कामाचा आढावा घेतला. त्यानंतर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांनी उपस्थितांना गुरुपौर्णिमेचे महत्त्व सांगून त्यानंतर सर्ज या माजी विद्यार्थी संघटना वाढविण्याची आणि कार्यरत असण्याची आवश्यकता सांगितली. तसेच त्यानिमित्ताने

भविष्यात केले जाणारे कार्यक्रम उद्धृत केले. आजी आणि माजी विद्यार्थ्यांची उपस्थिती आवश्यक आसल्याचे त्यांनी प्रकर्षाने सांगितले. महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनी आणि सर्जच्या सदस्य सुप्रिया वालावलकर पवार यांनी सर्ज ही संघटना आणि प्राचार्या नाईक यांचं अनुभवी मार्गदर्शनातून कोविड – १९ या महामारीमध्येही दटे रहो, कौशल्य प्रदान कार्यशाळा, स्टार विद्यार्थी समूह इत्यादी प्रकल्पातून कशा पद्धतीने सर्व विद्यार्थ्यांना साकारात्मकरित्या मदत केली या बद्दल माहिती दिली.

मुख्य अतिथींची ओळख करून देण्याचे काम माजी विद्यार्थी आणि महाविद्यालयातील प्राध्यापिका डॉ. अर्चना प्रभुदेसाई यांनी केले. कार्यक्रमाचे मुख्य अतिथी प्रा. दीपक मुरुडेश्वर सर यांनी आपले महाविद्यालयीन अनुभव मांडले, त्याचप्रमाणे माजी विद्यार्थी संघटनेची गरज/ आवश्यकता स्पष्ट करून, ही संघटना कशी कार्य करू शकते हे सुयोग्य शब्दात मांडले. या संघटनेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी यावं असं आवाहन त्यांनी या प्रसंगी केलं.

सरते शेवटी मान्यवरांचे आणि उपस्थितांचे या कार्यक्रमाला उत्तम प्रतिसाद दिल्याबद्दल आभार प्रदर्शन वीरेंद्र देवस्थळी यांनी मानले. विशेषतः माजी विद्यार्थी प्रकाश वाघचौरे यांनी केलेली पूर्व तयारी, कलाशाखेच्या १२ च्या विद्यार्थीनी सिद्धी पवार यांनी तयार केलेली आमंत्रण पत्रिका तसेच राजस याने तयार केलेली दीप प्रज्वलनाची चित्रफित यांचे विशेष कौतुक केले. त्याच प्रमाणे या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी दिल्याबद्दल प्राचार्या आणि उपप्राचार्य यांच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त केली. या कार्यक्रमाच्या गोड आठवणीचे छायाचित्र घेऊन पसायदानाने या कार्यक्रमाची सांगता झाली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुप्रिया वालावलकर यांनी केले. कार्यक्रमाची तांत्रिक बाजू दिव्येश बापट यांनी सांभाळली. हा संपूर्ण कार्यक्रम प्राचार्य, उपप्राचार्य, वेगवेगळ्या विषयांचे विभाग प्रमुख, पर्यवेक्षक, वाचनालयाचे प्रमुख, शिक्षकेतर कर्मचारी, (ग्रेट मायइंडस) ह्या माजी प्राध्यापक समूह, सर्ज या माजी विद्यार्थी संघटनेचे सदस्य, महाविद्यालयातील आजी विद्यार्थी इत्यादींनी फेस बुक यांच्या उपस्थितीत पार पडला.

सर्ज – माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव श्री. स्वप्नील मयेकर यांनी आयोजनात विशेष सहकार्य केले.

जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या लेखा विभागाने ३६ तासांचे मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन केले होते. TEL म्हणजेच (train earn learn) ICAI च्या WIRC यांच्यासह कौशल्य वाढीव अभ्यासक्रम आयोजित केला होता. ह्या अभ्यासक्रमात तब्बल २२७ विद्यार्थ्यांचा उदंड प्रतिसाद दिसून आला.

या अभ्यासक्रमात कॉर्पोरेट जगात आवश्यक असलेल्या संभाषण कौशल्याबरोबरच आपले संपूर्ण प्रभावी व्यक्तिमत्त्व कशा प्रकारे विकसित होईल याबद्दल ज्ञान देण्यात आले. तसेच, विविध सॉफ्ट किल्सच्या संबंधात ज्ञान दिले.

या क्षेत्रांमध्ये जॉब मिळविण्यासाठी व्यावहारिक अनुभव असणे देखील आवश्यक आहे ज्यामध्ये खालील गोष्टींचा समावेश होतो.

१. ई इन्कम टॅक्स भरणे.

२. टॅलीचा वापर

३. जीएसटी वापर

४. टीडीएस संबंधित ज्ञान

५. ऑडिटिंगमध्ये एक्सेलचा प्रभावी वापर

WIRC मधील सर्व शाखांनीही या सॉफ्ट स्किल कोर्सचे कौतुक केले.

विषय हे इंद्रियाला विषासमान आहेत.

प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, संपूर्ण लेखा विभाग व त्यातील कर्मचारी यांनी आम्हाला हा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यास मदत केली.

**कारगिल विजय दिवस संपन्न**

जोशी बेडेकर स्वायत्त, जम्मू काश्मीर अभ्यास केंद्र, मुंबई युनिटचे एनसीसी नेव्हल आणि आर्मी गर्ल्स युनिट कडून कारगिल विजय दिवस दिनानिमित्त २६ जुलै २०२१ रोजी संयुक्तपणे जीपी कॅप्टन सुहास फाटक यांचे, 'सशस्त्र सेवा-आज आणि उद्याचे तंत्रज्ञान' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन केले गेले होते.

या वेळी एकूण ९५ एनसीसी कॅडेट उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात ही राष्ट्रगीताने तर एनसीसी गीताने सांगता झाली.

**ऑनलाईन प्लॅटफॉर्म द्वारे गुरुपौर्णिमा साजरी**

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली वित्तीय बाजार विभागाने दिनांक २३ जुलै २०२१ रोजी गूगल मीट द्वारे गुरुपौर्णिमा साजरी केली. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून समन्वयक मृण्मयी थत्ते उपस्थित होत्या. विद्यार्थ्यांसह विभागातील सर्व शिक्षकांनी सहभाग घेतला होता.

एसवाय एफएमच्या विद्यार्थ्यांनी पूर्व - रेकॉर्ड केलेल्या कविता वाचन, नृत्य या संदर्भातील विडिओंचा समावेश होता. यात अमोघ आणि चिन्मय यांनी सादर केलेल्या व्हिडिओ मधून त्यांनी अनोखे प्रेम आणि आदर व्यक्त केले. वित्तीय विभागातील एकूण ७५ विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला होता. उपस्थित सर्व शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्या देत, प्रेम व्यक्त केले. यामिनी मयेकर यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रम संपला असे जाहीर केले.

**महाविद्यालयामध्ये मूलभूत गोष्टींवर मूल्यवर्धित अभ्यासक्रमाचे आयोजन**

प्राचार्य डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली मुंबई विद्यापीठ DLLE, NSS आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण शिक्षण परिषद (MGNCRE) यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयामध्ये दिनांक १५/०६/२०२१ ते ६/०७/२०२१ पर्यंत मूलभूत गोष्टींवर आधारित अभ्यासक्रमाचे आयोजन केले गेले होते. मुंबईच्या DLLE विद्यापीठाचे संचालक डॉ दिलीप पाटील, श्रीमती वर्षा परचुरे, संचालक परिवर्तन महिला संस्था, MGNCRE चे संचालक प्रा. चेतन चितळकर, श्री. सुधीर पुराणिक, NSS मुंबई विद्यापीठाचे संचालक, प्राचार्य डॉ. सुचित्रा ए. नाईक यांच्या उपस्थित हा अभ्यासक्रम संपन्न झाला.

अभ्यासक्रमासाठी एकूण ७ प्रतिष्ठित व्यक्तींचा सहभाग होता. या कोर्सला DLLE आणि NSS च्या ६० विद्यार्थ्यांनी चांगली उपस्थिती होती.

**पल्स पोलिओ ड्राइव्हचे आयोजन**

जोशी-बेडेकर महाविद्यालयाचे एनसीसी नेव्हल युनिट तसेच ठाणे महानगरपालिका (टीएमसी), ठाणे यांच्या आयुर्वेदिक केंद्रासह संयुक्तपणे पल्स पोलिओ ड्राइव्हचे आयोजन दिनांक २७ जून २०२१ रोजी करण्यात आले होते. ही मोहीम ठाण्यातील ४ वेगवेगळ्या ठिकाणी आयोजित केली होती. कोविड १९ चे भान ठेवत, सर्व नियमांचे पालन करत ही मोहीम पार पडली.

**महाविद्यालयाने केला विद्यार्थ्यांचा गुणगौरव कार्यक्रम**

महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनखाली मुंबई विद्यापीठाने आयोजित करण्यात आलेल्या अविस्कर संशोधन अधिवेशनात महाविद्यालयाने भाग घेतला होता. त्यातील अंतिम फेरी मध्ये यूजी मानविकी आणि कला श्रेणी अंतर्गत २

वेगवेगळ्या विभागात बक्षिसे जिंकली. मार्गदर्शक प्रा. मनीषा पांडे व डॉ. नीलम शेख यांच्या मार्गदर्शनाखाली नीतिन गौड, नीता जाधव, सायली पेंडसे आणि मीरा वर्तक यांनी जोमाने तयारी करत, आपला सहभाग नोंदवला होता. या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाकडून अभिनंदन करण्यात आले.

### आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा

जोशी बेडेकर कला - वाणिज्य महाविद्यालय ठाणे एन एस एस युनिट आणि डी एल एल ई अंतर्गत आंतरराष्ट्रीय योग दिनाचं औचित साधत विवेकानंद केंद्र कन्याकुमारी यांच्या सहकार्याने दिनांक २१ जून २०२१ रोजी यू ट्यूब द्वारे योग दिन साजरा केला गेला. यात महाविद्यालयाचे सर्व कर्मचारी, सदस्य यांनी सहभाग घेतला होता.

### इंग्रजी साहित्यातील कोर्सचे आयोजन यशस्वी

इंग्रजी विभागाने द्वितीय वर्षे मध्ये इंग्रजी साहित्य शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याच्या इंग्रजी कोर्सचे आयोजन केले.

कोर्सचा हेतू हा विद्यार्थ्यांसाठी आत्मविश्वास आणि कौशल्य यांची माहिती व्हावी व निर्भीडपणे इंग्रजी साहित्य शिकावे हा होता. या कोर्स दरम्यान ज्ञान आणि आत्मविश्वासाने सुसज्ज असलेल्या विद्यार्थ्यांना इंग्रजी विद्यार्थी म्हणून मोठी आव्हाने स्वीकारण्याची गरज आहे असे सांगण्यात आले. सत्र हे मनोरंजक होते, तर यात एकूण ३६ विद्यार्थ्यांनी सक्रिय सहभाग घेतला होता. सर्व उपस्थित असलेल्या प्राध्यापकांच्या तसेच विभाग प्रमुख डॉ. प्रमोद खराटे व महाविद्यालयाच्या प्राचार्या सुचित्रा नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा कोर्स संपन्न झाला.

### अनोख्या पद्धतीने उन्हाळी सुट्टीचे नियोजन

कोरोनामुळे सर्वजण नियमांमध्ये बांधले गेले आहेत आणि त्यामुळेच नेहमीच्या उत्साहात या वेळी उन्हाळी सुट्टीची मज्जा घेता येत नाही. म्हणून महाविद्यालयाने एक अनोख्या पद्धतीने उन्हाळी सुट्टीचे नियोजन केले. उन्हाळी सुट्टीची मज्या घेत काहीतरी नवीन शिकण्याची संधी उपलब्ध व्हावी या साठी एक छोटी नोंदणी प्रक्रिया पूर्ण केली आणि कोरोनाचे नियम लक्षात घेता उन्हाळी सुट्टीचा आनंद घेतला.

## बांदोडकर विज्ञान महाविद्यालय

### "The Power of Being Positive – Safaltaki Kunji"

वि. प्र. मं.चे. बा. ना. बांदोडकर स्वायत्त विज्ञान महाविद्यालयाच्या ह्युमन सायन्स व सोहम क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने ७ ऑगस्ट २०२१ रोजी "The Power of Being Positive - Safaltaki Kunji" या विषयावर डॉ. किरण पारिया, सहाय्यक प्राध्यापक यांनी मार्गदर्शन केले. या सत्राचे सूत्रसंचालन कु. तेजल परमार यांनी केले. त्यांनी सर्व मान्यवरांचे व विद्यार्थ्यांचे स्वागत करून सत्राची सुरवात केली आणि सत्राच्या विषयाची ओळख करून दिली. डॉ. किरण पारिया यांनी आव्हानात्मक परिस्थितीत शांतपणे विचार करून कशा प्रकारे आपण परिस्थितीचा सामना करू शकतो याबाबत उदाहरणादाखल समजावून सांगितले. या सत्रात ३४ सभासद सहभागी होते.

### शिक्षकांचे यश

प्रा. अभिजीत काळे यांची विना अनुदान विभागाचे उप-प्राचार्य पदी नियुक्ती करण्यात आली.

### ठाण्यातील महाविद्यालयांचा पूरग्रस्तांना मदतीचा हात

चिपळूण येथील पूरग्रस्तांना ठाण्यातील महाविद्यालयांनी मदतीचा हात दिला आहे. जीवनावश्यक वस्तूंनी भरलेला ट्रक सोमवारी चिपळूणला रवाना झाला.



राष्ट्रीय छात्र सेनेच्या १ महाराष्ट्र एनसीसी बटालियनच्या मुंबई बी ग्रुप आणि मुंबई विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या संयुक्त विद्यमाने, तसेच ठाण्यातील विद्या प्रसारक मंडळाचे बांदोडकर विज्ञान महाविद्यालय व जोशी-बेडेकर कॉलेज यांच्यासोबत श्रीमती जानकीबाई रामा साळवी कॉलेज, काळसेकर कॉलेज, के. एम. पटेल कॉलेज, ज्ञानगंगा कॉलेज व ग्रामीण शिक्षण संस्था माजिवडा ठाणे यांनी कोकण पूरग्रस्तांसाठी मदतीचा हात दिला आहे. जीवनावश्यक वस्तूंनी भरलेला ट्रक सोमवारी चिपळूणला रवाना झाला.

## विद्या प्रसारक मंडळाचे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय

### सत्र-दोन (२०२०-२०२१)

सत्र-दोन (२०२०-२०२१) चे वर्ग २९ जून रोजी सुरू झाले. दिनांक ७ जुलै रोजी विद्यार्थ्यांना रेकॉर्ड केलेल्या व्याख्यानांची लिंक देण्यात आली.

विधीच्या शेवटच्या वर्षाचे निकाल ३० जुलै रोजी घोषित करण्यात आले. आमच्या महाविद्यालयातून एकूण २४१ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. २३१ उत्तीर्ण होऊन महाविद्यालयाचा निकाल ९६% इतका लागला. १५१ विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले.

### तिसऱ्या वर्षाचे अव्वल विद्यार्थी

१) अय्यर ज्योथी वेंकटचलम - ६०६/८००

२) शर्मा अनुराधा हरिहरा - ६००/८००

३) प्रसाद रुग्मिणी - ५८५/८००

### दुसऱ्या वर्षाचे अव्वल विद्यार्थी

१) राव र. रवीकुमार - ७५०/१०००

२) झा. विवेक चंद्रमोहन - ७४०/१०००

३) साळवी शर्वरी हर्षद - ७३९/१०००

### मागास वर्ग यामध्ये अव्वल विद्यार्थी

१) लोखंडे दिलीप किसन - ५६३/८००

### आषाढी एकादशी २० जुलै

आयुक्तांनी जरी सुट्टी जाहीर केली असली तरी देखील त्या दिवशी द्वितीय वर्ष विधीचे वर्ग घेण्यात आले.

### द्वितीय सत्र अंतर्गत

१० जुलै रोजी विद्यार्थ्यांनी सत्र-४ विषयांसाठी निवडलेले प्रकल्प विषय ऑनलाइन पद्धतीने सादर करणे आवश्यक होते. २५ जुलै रोजी विद्यार्थ्यांना त्यांच्या प्रकल्पांसाठी त्यांच्या कामाच्या प्रगतीचा अहवाल सादर करण्यास सांगितले होते. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अहवाल सादर करण्यापूर्वी प्राथमिक अहवाल सादर करण्यास सांगितले होते.

### व्याख्यानासाठी आमंत्रित




प्रभारी प्राचार्या डॉ. श्रीविद्या जयकुमार ह्यांना डॉ. एम. जी. आर. एज्युकेशनल ॲण्ड रिसर्च इन्स्टिट्यूट (मान्यता प्राप्त विद्यापीठ), चेन्नई ह्या ठिकाणी ऑनलाईन पद्धतीने 'सेनसीटाइझेशन फॉर जेंडर इक्वालिटी' ह्या विषयावर व्याख्यान देण्यासाठी आमंत्रित करण्यात आले होते.

**असाइनमेंट आधारित मूल्यमापन (एबीई)**

बार कौउन्सील ऑफ इंडियाची आवश्यकता पूर्ण करण्यासाठी विद्यापीठाने ABE ला मे, २०२०, सत्र-दोन आणि सत्र-चारसाठी दिलेल्या सरासरी गुणांच्या बदल्यात अधिसुचित केले, जे कोविड-१९ साठी देशव्यापी लॉकडाऊनमुळे आयोजित केले जाऊ शकले नाही. असाइनमेंट सादर करण्याची शेवटची तारीख ३१ जुलै २०२१ होती. मात्र एका विद्यार्थ्याने मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलेल्या रिट याचिकेत UGC ने ठरवलेल्या सरासरी गुणांच्या आधारे विद्यापीठाने निकाल आधीच घोषित केला असल्याने आवश्यकतेचा आग्रह न घेण्याचे BCI ने मान्य केले. कोर्ट युनिव्हर्सिटी समोर बीसीआयच्या निवेदनावर एबीई अधिसूचना मागे घ्या आणि निकाल जाहीर करा असे घोषित करण्यात आले.

जुलै २०२० मध्ये आमचे २०२०-२०२१ चे अंतिम वर्षाचे विद्यार्थी श्री. सय्यद नाजर अब्बास यांनी इन्सॉल्वहन्सी अँड बँकरप्टसी कोड, २०१६ वरील प्रश्न मंजुषा स्पर्धेत १०% उमेदवारांमध्ये राष्ट्रीय गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. स्पर्धा इन्सॉल्व्हन्सी अँड बँकरप्टसी बोर्ड ऑफ इंडिया द्वारे आयोजित करण्यात आली होती.



## विद्या प्रसारक मंडळाचे तंत्रनिकेतन

**• National Policy 2020**

'National Policy 2020' ला १ वर्ष पूर्ण झाले. व्ही. पी. एम. पॉलिटेक्निकने या विषयाला अनुसरून ८ दिवसीय ऑनलाईन वेबिनारचे आयोजन केले. या वेबिनारला विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी उपस्थिती दर्शवली.

'National Policy 2020' ला विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी शैक्षणिक दृष्ट्या कोणती तरतूद केली आहे या विषयांतर्गत वेबिनारची मांडणी केली. दिनांक ३०/०७/२०२१ ते १०/०८/२०२१ मध्ये या वेबिनारचे आयोजन केले.

"Equity and Inclusion", "Multidisciplinary and Holistic Education", "Skill, Entrepreneuship Development and Employability : Challenges and opportunities", "Effect of NEP on Youth Empowerment and Sports Development, Indian knowledge System, Language, Arts and Culture", "Quality Education, Accreditation and Treacher Development", "Research, Innovation and Ranking", "Use of Technology in Education".

वरील विषयांवर वेबिनारचे आयोजन केले. 'National Policy 2020' मध्ये या वरील विषयांचा उलगडा पॉलिटेक्निकच्या प्राध्यापकांनी विद्यार्थ्यांना केला. सौ. गौतमी पुजारे, सौ. ऋतुजा तेंडुलकर, सौ. राजश्री पाटील, सौ. अर्चना कालिया, सौ. वैशाली जोशी, डॉ. उषा राघवन, डॉ. गीताली इंगवले व सौ. सुहासिनी शुक्ल या प्राध्यापकांनी वरील विषय वेबिनारमध्ये सादर केले.

• ३० जून ते ३० जुलै २०२१ दरम्यान 'Innovation Ambassador Training (Foundation level) by MOE Innovation Cell & AICTE ने प्रशिक्षणार्थी ऑनलाईन कार्यक्रम आयोजित केला. सौ. स्मिता खंडागळे, सौ. गौतमी पुजारे, डॉ. उषा राघवन, सौ. अर्चना कालिया, सौ. राजश्री पाटील यांनी प्रशिक्षण यशस्वीरित्या पार

पाडले. डॉ. उषा राघवन व सौ. अर्चना कालिया यांनी 'Advance Level' चे प्रशिक्षण ऑनलाईन पद्धतीने घेतले.

• दिनांक २ ऑगस्ट ते ६ ऑगस्ट २०२१ च्या दरम्यान तृतीय वर्षीय कॉम्प्युटर इंजिनिअरिंग व इन्फोरमेशन टेक्नॉलॉजी विद्यार्थ्यांसाठी 'इंटर्नशिप वेबिनार'चे आयोजन केले. इंडस्ट्रीजमधील अनुभवी व्यक्तींचे या वेबिनारद्वारे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन लाभले. वेबिनारचे नियोजन खालीलप्रकारे करण्यात आले.

दिनांक २/८/२०२१ : श्री. सतीश महाजन (GM-ITES, लोअर परेल, मुंबई) यांनी "What Students should expect from Internship" या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक ३/८/२०२१ : श्री. महेश यादव यांनी Artificial Intelligence व श्री. मुकुल टिळक (Veritas Technologies, Pune) यांनी 'Web Scrapping' या विषयावर संभाषण केले.

दिनांक ४/८/२०२१ : श्री. राजन शुक्ला (Director, Accunity Services LLP) यांनी Digital Marketing व श्री. किरण भोर (CEO, Accunity Services LLP) यांनी 'Web Development' या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक ५/८/२०२१ : प्रिया वैती यांनी नेटवर्क सिक्युरिटी व स्वप्निल कुलकर्णी (Control case International Private Ltd.) यांनी 'सायबर सिक्सुरिटी' या विषयावर मार्गदर्शन केले.

दिनांक ६/८/२०२१ : श्री. चिन्मय गडकरी (Infosys Pvt. Ltd.) यांनी Machine Learning व श्री. दाते (Ex-Philips) यांनी 'एक मुलाकात' या विषयी संभाषण केले.

• AICTE च्या शिफारसी नुसार सर्व व्यावसायिक शैक्षणिक कार्यक्रमांना विशिष्ट कालावधीसाठी "Industrial Training" आवश्यक आहे.

MSBTE च्या 'I' scheme च्या अभ्यासक्रमानुसार ६ आठवड्यांची "Industrial Training" आवश्यक आहे. औद्योगिक क्षेत्राचे वातावरण व तिथे आवश्यक असलेले कौशल्य आत्मसात करण्यासाठी विद्यार्थ्यांना "Industrial Training" उपयोगी आहे.

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनातील इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स, इन्स्ट्रुमेंन्टेशन व इलेक्ट्रीकल पॉवर सप्लाय विभागाने ३ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट २०२१ च्या दरम्यान वेबिनारचे आयोजन ऑनलाईन पद्धतीने केले.

दोन सत्रामध्ये वेबिनारचे आयोजन केले होते. तंत्रनिकेतनातील माजी विद्यार्थीसंघाची साथ लाभली.

दिनांक ३/८/२०२१ – प्रथम सत्र : "Material Handling" या विषयावर Mr. Suyash Kulkarni (Director and CTO Ashida Electronics) यांनी मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्र : "Introduction to Automation" या विषयावर योगिता कात्रे (Consultant, AMT. TAACT) यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ४/८/२०२१ – प्रथम सत्र : "Transforming idea into product" या विषयावर प्रोफेसर सचीन गोरे (प्राचार्य, कला विद्या मंदिर) यांनी मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्र : "Electric Vehicle" या विषयावर श्री. अनुराग पाटील (Director, Operations MASSTECH Controls) यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ५/८/२०२१ – प्रथम सत्र : 'IOT' या विषयावर श्री. महेश यादव (Associate Consultant TCs) यांनी मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्र : "Safety Culture" या विषयावर श्री. अनिरुद्ध घैसास (Founder and CEO, Take Care Safely) यांनी मार्गदर्शन केले.

दिनांक ६/८/२०२१ – प्रथम सत्र : 'Soft Skills Development' या विषयावर श्री. निखिल पुजारे (Founder and CEO, रुपांतर इमेज कन्सलटन्ट) यांनी मार्गदर्शन केले.

द्वितीय सत्र : "Advancement in Renewable Energy" या विषयावर श्री. गौरव महाशब्दे (Senior Analyst, Black and viatch Management consulting) आपले अनुभव सत्रात मांडले.

दिनांक ७/८/२०२१ – प्रथम सत्र : 'Cyber Security' या विषयावर श्री. निखिल जोशी (Security Consultant, Lucideus Technologies Pvt. Ltd.) आपले विचार मांडले.

द्वितीय सत्र : "Hi There" या विषयावर श्रीयुत विश्वास दाते (Business Head (माजी) Philips) यांनी मार्गदर्शन केले.

**इलेक्ट्रीकल पॉवर सिस्टीम विभाग**

१) ऋतुजा कांबळी यांनी 'MSBTE' मान्यता प्राप्त ३ दिवसीय राष्ट्रीय स्थरावर ऑनलाईन पद्धतीने आयोजित केलेल्या FDP मध्ये सहभाग घेतला.


दिनांक १४ जुलै ते १६ जुलै २०२१ दरम्यान हा कार्यक्रम होता. सदर कार्यक्रम भारती विद्यापीठ पुणे यांनी आयोजित केला.

२) तृतीय विद्यार्थ्यांनी "Udemy, Intershala" या सारख्या ऑनलाईन प्लॅटफॉर्मने आयोजित केलेल्या कोर्सेस (१५ ते ४० तासाच्या कालावधीसाठी) मध्ये सहभाग घेतला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था, ठाणे

**जुलै २०२१ मधील कार्यक्रम / वार्ता**

१ जुलै : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांच्यासह एमएमएस प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी 'हाऊ एमएमएस कॅन शार्पन डोमेन स्किल्स थ्रू अकॅडमिक एक्सलंस' या विषयावर एक वेबिनार आयोजित केले.



१ जुलै : डॉ. पल्लवी चंदवासकर यांनी एमएसीसीआयए आणि वैज्ञानिक जुगाड फंडा उपक्रमा अंतर्गत इंडस्ट्री कनेक्ट कार्यक्रमासाठी एमएमएसच्या विद्यार्थ्यांची सायकोमेट्रिक चाचणी आयोजित केली ज्यामध्ये ६६ विद्यार्थी उपस्थित राहिले आणि ५० विद्यार्थी कार्यक्रमासाठी निवडले गेले.





३ जुलै : डॉ. नीतिन जोशी, डॉ. मीनाक्षी मल्होत्रा आणि श्री. वैभव पंडित, सीआयआय रिफ्रेशर कोर्सला उपस्थित राहिले.

८ जुलै : डॉ. व्ही. एन. ब्रिम्सला एचपीई (हेवलेट पॅकार्ड एंटरप्राइझ) कडून त्यांच्या २० व्यवस्थापकीय अधिकाऱ्यांसाठी 'गेट सेट गोल' या ध्येय निश्चिती संदर्भात सल्ला सेवा पुरविण्याची संधी मिळाली.

८ जुलै : डॉ. नीतिन जोशी आणि डॉ. गुरुप्रसाद मूर्ती यांनी 'नवीन विचार : बदल व्यवस्थापन' या विषयावर ब्रिम्सच्या प्राध्यापक सदस्यांसाठी एक व्याख्यान सत्र आयोजित केले.

८ जुलै : प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी ब्रिम्सच्या प्राध्यापक सदस्यांसाठी 'क्रिएटिव्हिटी, इनोव्हेशन, डिझाईन थिंकिंग आणि ६ थिंकिंग हॅट्स' या विषयावर एक माहितीसत्र आयोजित केले.

८ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे 'एम एम एस अ पाथ फॉर प्रोफेशनल डेव्हलोपमेंट' या विषयावर डॉ. पंकज नंदूरकर यांचे वेबिनार आयोजित करण्यात आले.




९ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे 'डिजिटल मार्केटिंग करिअर प्रॉस्पेक्ट्स' या विषयावर श्री. चैतन्य पवार यांचे वेबिनार आयोजित करण्यात आले.




९ - ११ जुलै : डॉ. नीतिन जोशी यांनी वेळणेश्वरच्या महर्षी परशुराम कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग (MPCOE) ला विषय तज्ज्ञ म्हणून भेट दिली.

९ जुलै : डॉ. मीनाक्षी मल्होत्रा यांनी विद्यार्थी समिती सदस्यांच्या सहकार्याने 'ब्रिम्स कनेक्ट' या मासिक कार्यक्रमाचे आयोजन केले.

१३ जुलै : डॉ. स्मिता जपे यांनी एमएमएसच्या प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांसाठी 'नोकरी / नियुक्ती आणि कारकिर्दी मध्ये ग्रीष्मकालीन उमेदवारी प्रकल्पांचे महत्त्व' या विषयावर वेबिनार आयोजित केले. यू एस ए मधील दोन माजी विद्यार्थी संकेत पाटोळे आणि सुयोग पाटील हे देखील या सत्रात सामील झाले आणि त्यांनी त्यांच्या प्रकल्प उमेदवारी काळातील धडे, कारकिर्दीमध्ये वापरण्याबाबतचे अनुभव विद्यार्थ्यांना सांगितले.




१४ जुलै : डॉ. नीतिन जोशी, डॉ. स्मिता जपे, डॉ. पल्लवी चंदवासकर आणि डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, सीआयआय बिझनेस एक्सेलेंस असेसर्ससाठी आयोजित 'मॅनेजींग आउटसाइड बाय मास्टरींग इनसाइड-माइंडफुल लीडरशिप' या विषयावरील वेबिनारमध्ये उपस्थित राहिले.

१५ जुलै : प्रा. कृणाल के. पुंजानी आणि प्रा. कला महादेवन यांचा 'ट्रान्सिशनिंग टू ऑनलाईन लर्निंग इन हायर एजुकेशन : इन्फ्लुएन्स ऑफ अवेअरनेस ऑफ कोविड १९ अँड सेल्फ-एफिकसी ऑन पर्सीव्हड नेट बेनिफिट्स अँड इंटेन्शन' हा शोधनिबंध स्कोपस अनुक्रमित 'एज्युकेशन अँड इन्फर्मेशन टेक्नॉलॉजीज' - या IFIP टेक्निकल कमिटी ऑफ एज्युकेशनच्या अधिकृत नियतकालिका तर्फे स्वीकारण्यात आला.

अवघे जग सुखी राहावे अशी दृढ इच्छा केल्याने मनुष्य स्वतः सुखी होतो.

२२ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्सच्या आय. आय. सी. समिती तर्फे डॉ. मीनाक्षी मल्होत्रा, प्रा. विभूती सावे आणि प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी ‘एंजेल इन्व्हेस्टमेंट / व्हीसी फंडिंग अपॉर्च्युनिटीस ऐट अरली स्टेज एंटरप्रेनिअर्स’ या विषयावर श्री. विराज कुलकर्णी (डायरेक्टर - मेकसिटी प्रायव्हेट लिमिटेड) यांचे वेबिनार आयोजित केले.




२२ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे ‘CET ची तयारी कशी करावी’ या विषयावर श्री. विनय वाघ यांचे वेबिनार आयोजित करण्यात आले.




२४ जुलै : फ्री प्रेस जर्नलने त्यांच्या वार्षिक वर्धापनदिन अंकात डॉ. व्ही एन ब्रिम्स बद्दल एक लेख प्रकाशित केला.


Brimming with confidence

२६ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्सच्या आयआयसी समिती तर्फे प्रा. कृणाल के. पुंजानी यांनी ‘इंटलेक्चुअल प्रॉपर्टी राईट्स (IPRs) अँड आय पी मॅनेजमेंट फॉर स्टार्ट-अप - अ फार्मा पर्स्पेक्टिव्ह’ या विषयावर डॉ. अर्लोफ जॉनविएरा यांचे एक वेबिनार आयोजित केले.




२८ जुलै : डॉ. पंकज नंदूरकर यांनी उद्योजकता विकासासाठी डॉ. व्ही. एन. ब्रिम्स आणि आय. आय. टी. मुंबईचा ई-सेल यांच्याशी सामंजस्य करार केला.




Memorandum of Understanding
Between

Dr. V N BRIMS

&

E-Cell, IIT Bombay

२९ जुलै : डॉ. व्ही एन ब्रिम्स तर्फे ‘हाऊ एमएमएस नर्चरस द ऍबिलिटी ऑफ थिंकिंग डिफरंटली थ्रू इनोव्हेशन अँड डिजाईन थिंकिंग’ या विषयावर

प्रा. कृणाल के. पुंजानी यांचे वेबिनार आयोजित करण्यात आले.




प्रा. विभूती सावे यांनी ३० जून – ३० जुलै २०२१ दरम्यान दूरस्थ माध्यमाद्वारे एम ओ इच्या इनोव्हेशन सेल आणि ए आय सी टी इ तर्फे आयोजित 'इनोव्हेशन ॲम्बेसेडर (फाऊंडेशन लेव्हल)' चे प्रशिक्षण घेतले.



प्रा. कांचन अक्षय यांचा 'इम्पॅक्ट ऑफ कोविड–१९ ऑन एम्प्लॉई वर्क परफॉर्मन्स' हा शोधनिबंध 'टर्किश ऑनलाइन जर्नल ऑफ क्वालिटेटिव्ह इन्क्वायरी' या स्कोपस अनुक्रमित नियतकालिकामधे प्रकाशित झाला.

डॉ. व्ही. एन. ब्रिम्सला एसएनडीटी महिला विद्यापीठ आणि मुंबई विद्यापीठाकडून विद्यावाचस्पती (पीएच.डी.) केंद्राची मान्यता मिळाली.

•••

## विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर



विपत्तीमध्ये तू माझं रक्षण कर,
ही माझी प्रार्थना नाही.
विपत्तीमध्ये मी भयभीत होऊ नये
एवढीच माझी इच्छा.
दु:खतापानं व्यथित झालेल्या माझ्या मनाचं
तू सांत्वन करावंस अशी माझी अपेक्षा नाही
दु:खावर जय मिळवता यावा
एवढीच माझी इच्छा.
माझ्या मदतीला कोणी न आल्यास
माझं बळ मोडून पडू नये एवढीच इच्छा.
जगात माझं नुकसान झालं,
केवळ फसवणूकच वाट्याला आली,
तर माझं मन खंबीर राहावं एवढीच माझी इच्छा.
माझं तारण तू करावंस, मला तारावंस,
ही माझी प्रार्थना नाही.
तरून जाण्याचं सामर्थ्य माझ्यात असावं
एवढीच माझी इच्छा.
माझं ओझं हलकं करून
तू माझं सांत्वन केलं नाहीस
तरी माझी तक्रार नाही;
ते ओझं वाहायाची शक्ती मात्र माझ्यात असावी,
एवढीच माझी इच्छा.
सुखाच्या दिवसात नतमस्तक होऊन
मी तुझा चेहरा ओळखावा,
दु:खाच्या रात्री
सारं जग जेव्हा माझी फसवणूक करील
तेव्हा तुझ्याविषयी माझ्या मनात
शंका निर्माण होऊ नये
एवढीच माझी इच्छा!

**– गुरुदेव रवींद्रनाथ टागोर**

**Posting under the Reg. No. MH/MR/TNC-27/2004-2006**

# विद्या प्रसारक मंडळ, ठाणे

- अत्याधुनिक दृक् श्राव्य यंत्रणा
- वातानुकूलित प्रसन्न वातावरण
- वाहने उभी करण्यासाठी प्रशस्त जागा

अशा सुविधांनी युक्त

| सभागृहाचे नाव | ठिकाण | आसन क्षमता |
|---|---|---|
| थोरले बाजीराव पेशवे सभागृह | महाविद्यालय परिसर | ३०० |
| कात्यायन सभागृह | कला/वाणिज्य इमारत | १६० |
| पातंजली सभागृह | बा. ना. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय इमारत | १६० |
| पाणिनी सभागृह | डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था इमारत | १८० |
| मनु सभागृह | वि. प्र. मं. चे ठाणे नगरपालिका विधी महाविद्यालय इमारत | २५० |

**❉ संपर्क ❉**

कार्यवाह

**विद्या प्रसारक मंडळ**

विष्णूनगर, नौपाडा, ठाणे - ४०० ६०२

दूरध्वनी क्रमांक - २५४२६२७०

हे मासिक प्रकाशक आणि संपादक डॉ. विजय वासुदेव बेडेकर व मुद्रक श्री. विलास सांगुर्डेकर, परफेक्ट प्रिण्टस्, नुरीबाबा दर्गा रोड, ठाणे - ४०० ६०१ या मुद्रणालयामध्ये छापून विद्या प्रसारक मंडळ, जिल्हा ठाणे-४०० ६०२ यांच्याकरिता विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर, विष्णूनगर, ठाणे - ४०० ६०२ इथून प्रकाशित केले.